www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com +91 97023 86118




दैनिक

# लोकरक्षणाय

प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक

लोकशाहीच्या संरक्षणार्थ




सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ ■ वर्ष - ०२ ■ अंक १३५ ■ पृष्ठे- ०६ ■ ठाणे, बुधवार, ०९ ऑक्टोबर २०२४ ■ रु. २/- ■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118

## थोडक्यात



### ■ चहा टपरीवर चहाच्या आडून अंमली पदार्थांची विक्री; आरोपी जेरबंद

**पनवेल-** उरण-पनवेल महामार्गालगत जासई येथील सुरुंगपाडा येथे चहाची टपरी चालवण्याबरोबरच अंमली पदार्थाची विक्री करणाऱ्या सराईत गुन्हेगाराला अंमली पदार्थ विरोधी पथकाने छापा मारुन अटक केली आहे. राजन बाळा राठोड (३२) असे या गुन्हेगाराचे नाव असून पोलीस पथकाने त्याच्या चहाच्या टपरीतून २१ ग्रॅम हेरॉईन आणि १ किलो गांजा तसेच चिलीम, रिजला पेपर, गोगो, सिल्वर फॉइल पेपर असा ६ लाख रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. मुंबईतील गोवंडी येथे राहणारा सराईत गुन्हेगार उरण-पनवेल महामार्गालगत एका पत्र्याच्या बंदिस्त शेडमध्ये हेरॉईन आणि गांजा या सारख्या अंमली पदार्थाची विक्री करत असल्याची माहिती अंमली पदार्थ विरोधी पथकाला मिळाली होती. सदर माहितीच्या आधारे सहाय्यक पोलीस आयुक्त भाऊसाहेब ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरु आहे.

### ■ विनेश फोगाटने एका झटक्यात राजकीय मैदान मारले !

**नवी दिल्ली :** हरियाणा विधानसभा निवडणुकीत ऑलिम्पिकपटू विनेश फोगाटने जुलाना मतदारसंघातून निवडणूक लढवली होती ज्यात तिने बाजी मारत भाजपच्या (BJP) योगेश कुमारचा पराभव केला. तिच्या विजयामुळे गेली पंचवीस वर्ष काँग्रसला हुलकावणी देणारा हा मतदारसंघ अखेर त्यांच्या ताब्यात आला आहे.

### ■ पुण्यातील पेशवेकालीन ओंकारेश्वर मंदिरात चोरी !

**पुणे :** पुण्यातील प्रसिद्ध पेशवेकालीन ओंकारेश्वर मंदिराचा दरवाजाचे कुलूप तोडून चोरट्याने आत प्रवेश केला. गाभाऱ्यातील दान पेटी फोडून त्यातील रक्कम चोरुन नेल्याचा प्रकार समोर आला आहे. चोरट्याने चेहरा झाकून घेतला असल्याने त्याची ओळख पडू शकली नाही. ही घटना ६ ऑक्टोबर रोजी पहाटे अडीच ते तीन वाजण्याच्या सुमारास घडली. ओंकारेश्वर मंदिर हे पेशवेकालीन मंदिर आहे. जवळपास २८४ वर्षाचा इतिहास या मंदिराचा आहे. मराठा साम्राज्यात कृष्णाजी पंत चित्रव यांनी त्यांचे आध्यामिक गुरु शिवराम भट यांच्या आदेशानुसार हे मंदिर बांधले होते, असे मानले जाते.

### ■ 'उद्धव ठाकरेंचं सर्वकाही आधीच ठरलं होतं, मग.. शिंदे गटाच्या नेत्याचा मोठा गौप्यस्फोट

**मुंबई :** विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सत्ताधारी आणि विरोधक एकमेकांवर टीका करताना दिसत आहेत. शिवसेनेत बंड झाल्यानंतर एकनाथ शिंदे काही नेत्यांना घेऊन भाजपसह (BJP) सत्तेत सहभागी झाले. दरम्यान बंडाच्या वेळी नेमकं काय घडलं होतं त्याबाबत आता विविध दावे केले जात आहेत. तसेच उद्धव ठाकरे यांनी महाविकास आघाडी बरोबर हातमिळवणी करीत असताना भाजपाकडून ऑफर आली होती, असा खुलासा शिंदे गटाचे नेते संजय शिरसाट यांनी केला आहे.

### ■ सोलापुरातील पत्रकारांच्या घरांसाठी ७ कोटींचा निधी

**सोलापूर :** सोलापुरातील पत्रकारांसाठी असलेल्या गृहनिर्माण प्रकल्पाच्या बाह्य सुविधांसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महाराष्ट्र निवारा निधीतून 7 कोटींचा निधी मंजूर केला. त्याबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आभार मानत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा सोलापूर श्रमिक पत्रकार संघ आणि राज्य मराठी पत्रकार संघ यांच्या वतीने सन्मान करण्यात आला.

## रामभक्तांसाठी अयोध्येत उभारणार महाराष्ट्र भवन

### मान्यवरांच्या हस्ते झाले वास्तूचे भूमिपूजन



● **नवी दिल्ली, प्रगती शर्मा :**

श्रीराम जन्मभूमीचं महत्त्व देशातील राम भक्तांसाठी खूप मोठं आहे. प्रभू रामाच्या अयोध्या नगरीत त्यांच्या भव्य मंदिराची स्थापना झाली हा दिवस देशाभरात मोठ्या जल्लोषात साजरा केला होता. अशातच आता अयोध्येत राम भक्तांच्या निवासासाठी महाराष्ट्र भवनाची उभारण्याची संकल्पना मांडण्यात आली होती. याचपार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य सार्वजनिक बांधकाम विभागाकडून या होणाऱ्या वास्तूसाठीचे भूमिपूजन मंगळवारी संपन्न झाले. राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण, यूपीचे उपमुख्यमंत्री केशव प्रसाद मौर्य यांच्या हस्ते हे भूमिपूजन करण्यात आले. त्यावेळी राज्य शासनाच्या सचिव मनीषा म्हैसकर, यूपीचे आमदार आदींची विशेष उपस्थिती होती. अयोध्येत महाराष्ट्रामधून येणाऱ्या राम भक्तांच्या निवासाची उत्तम व्यवस्था व्हावी यासाठी अयोध्येत महाराष्ट्र भवन उभारले जात आहे.

पान २ वर

## मुंबईतील नद्या आणि समुद्र होणार एकदम चकाचक !

### वैज्ञानिक पद्धतीने होणार स्वच्छ !

● **मुंबई, यश सावंत :**

मुंबईतील समुद्र आणि नद्या वैज्ञानिक पद्धतीने स्वच्छ केल्या जाणार आहेत. मुंबईतील समुद्रकिनारी विकेंडला मोठी गर्दी पाहायला मिळते. मरीन लाईन्स, गिरगाव चौपटी, वांद्र, वरळी, दादर चौपटी फिरण्यासाठी मोठ्या संख्येने पर्यटक येत असतात. समुद्रात खूप मोठ्या प्रमाणात साचलेला कचरा किनाऱ्यावर आलेला दिसतो. नाले, जल प्रदूषणामुळे मुंबईतील नद्या गायब झाल्या आहेत. पण आता मुंबईतील समुद्र आणि नद्या चकाचक झालेल्या दिसल्या तर आश्चर्य मानायला नको. कारण मुंबईतील समुद्र आणि नद्या वैज्ञानिक पद्धतीने स्वच्छ केल्या जाणार आहेत. यासंबंधी नेदरलँडसोबत समंजस्य करार करण्यात



आला आहे. मुंबई आणि उपनगरातील नद्या तसेच समुद्रात प्लास्टिक आणि कचरा खूप मोठ्या प्रमाणात जातो. यामुळे यांच्या स्वच्छतेचा मोठा प्रश्न अनेक वर्षांपासून उभा आहे. राज्य सरकारने यावर उपाययोजना सुरु केल्या आहेत.

पान २ वर

## अजित पवार यांची अखेर बारामतीमधून उमेदवारी जाहीर, प्रफुल पटेल यांची घोषणा



● **मुंबई, राकेश गायकवाड :**

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे मतदारसंघ बदलाची चाचपणी करत असल्याच्या चर्चा सुरू असतानाच राष्ट्रवादीचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल पटेल यांनी अजित पवार यांची उमेदवारी जाहीर केली आहे. अजित पवार हेच बारामती विधानसभेतून निवडणूक लढतील, अशी घोषणा प्रफुल पटेल यांनी केली आहे. पटेल यांच्या घोषणेनंतर अजित पवार यांच्या मतदारसंघ बदलण्याच्या चर्चांना आता पूर्णविराम मिळाला आहे. सुप्रिया सुळे विरुद्ध सुनेत्रा पवार या नणंद भावजय यांच्यात झालेल्या लोकसभा निवडणुकीत बारामती विधानसभेतून सुनेत्रा पवार यांना सुमारे २५ हजारांची पिछाडी मिळाली. बारामतीमध्ये हजारो कोटींचे विकासकामे करूनही बारामतीकरांनी साथ दिली नाही, अशी खंत गेली तीन महिने अजित पवार सतत बोलून दाखवत होते. तसेच बारामतीशिवाय माझ्याशिवाय दुसरा कुणी आमदार आल्यावर तुम्हाला कळेल. जिथे पिकते तिथे विकत नाही, अशी नाराजीही त्यांनी अनेक वेळा बोलून दाखवली. तसेच पुत्र जय पवार बारामतीमधून लढतील, असे संकेतही त्यांनी गेली दोन महिने दिले. मात्र पक्षातील पदाधिकारी आणि बारामतीमधील स्थानिक नेते अजित पवार यांच्या उमेदवारीसाठीच आग्रही होते. अजित पवार यांनीही अगदी शेवटापर्यंत उमेदवारीसंदर्भात संभ्रम ठेवला. अजित पवार हे पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष असल्याने ते स्वत:ची उमेदवारी जाहीर करू शकत नाहीत. त्यामुळे राष्ट्रीय कार्याध्यक्ष या नात्याने मी त्यांची उमेदवारी जाहीर करतो, अशी घोषणा प्रफुल पटेल यांनी केली. मात्र, सोमवारी रात्री पार पडलेल्या बारामतीमधील व्यापारी मेळाव्यात बोलताना बारामतीतून आपणच उमेदवार असू, असे अप्रत्यक्षरित्या अजित पवार यांनी सांगितले.

पान २ वर

## भिवंडीतील पोलीस चौक्या अलर्ट मोडवर



● **भिवंडी, विवेक गुंजाळ :**


भिवंडी शहरात पोलीस यंत्रणा नेहमीच अलर्ट असते. पोलिसांच्या कर्तव्यदक्षतेमुळे शहरात शांतता व सुव्यवस्था कायम नांदत असून पोलिसांच्या मोहल्ला कमिटी, शांतता कमिटीच्या माध्यमातून हिंदू मुस्लिम भाईचारा प्रस्थापित करण्यात पोलीस यंत्रणांसह सेवाभावी संस्थांना यश आलेले आहे.

नवरात्रौत्सवाच्या पार्श्वभूमीवर भिवंडी पोलीस उपायुक्त कार्यालयाच्या कार्यकक्षेत असलेल्या सहा पोलीस ठाण्यांमध्ये पोलीस अधिकारी कर्मचारी अलर्ट मोडवर असून या सहाही पोलीस ठाण्यांच्या अखत्यारीत असलेल्या पोलीस चौक्यांमध्ये देखील पोलीस यंत्रणा सक्रिय करण्यात आली आहे.

पान २ वर

## सरेंडर व्हा, नाही तर.. बोपदेव घाट बलात्कार प्रकरणातील आरोपींना पुणे पोलिसांचा निर्वाणीचा इशारा

● **पुणे, अभिजित येरल्लू :**



पुण्यातील बोपदेव घाट येथे गेल्या गुरुवारी रात्री ११ वाजता मित्रा सोबत फिरायला गेलेल्या तरुणीवर तिघा नराधमांनी सामूहिक बलात्कार केला. या घटनेला आज पाच दिवस झाले तरी पोलिसांना आरोपीचा सुगावा लागलेला नाही. पोलिसांची विविध पथके गुन्हेगारांचा शोध घेत आहे. मात्र, गुन्हेगार अद्याप जाळयात अडकलेले नाहीत. त्यामुळे पुणे पोलिसांनी तिन्ही गुन्हेगारांना निर्वाणीचा इशारा दिल्याची माहिती आहे. पुणे पोलिसांनी त्यांना सरेंडर होण्यास सांगितले आहे. सरेंडर न झाल्यास एन्काउंटर करण्याचा इशारा देखील दिला असल्याची माहिती पुणे पोलिस दलातील सूत्रांनी दिली आहे. दरम्यान, याची तयारी देखील पोलिसांनी केली असून गुप्त बातमीदारांमार्फत पोलिस आरोपींची माहिती आहेत. या सोबतच त्यांचा शोध घेण्यासाठी सिंबा या आर्टिफिशीयल इंटेलिजन्सचा देखील पोलिस वापर केला जात आहे.

पान २ वर

## कल्याण ग्रामीणमधील २७ गावातील नागरीकांना पाणी प्रश्नावर लवकरच दिलासा मिळणार



● **कल्याण, आकाश कांबळे :**

कल्याण ग्रामीणमध्ये अनेक ठिकाणी अमृत पाणी पुरवठा योजनेचे काम सुरु आहे. मात्र या कामात दिरंगाई होत असल्याने नागरीकाना पाणी समस्येचा सामना करावा लागत आहे. मनसे आमदार राजू पाटील यांनी योजनेच्या कामावर प्रश्न उपस्थित करीत ही कामे जलद गतीने पार पाडली जावीत यासाठी पाठपुरावा केला आहे.

आमदार राजू पाटील यांनी अधिकारी वर्गासोबत सुरु असलेल्या योजनेच्या कामाची पाहणी केली. सध्या सुरु असलेल्या कामाविषयी समाधान व्यक्त केले आहे.

या कामा दरम्यान ढिसाळ नियोजन आणि मुद्दाम कामे थांबविली गेल्याने ही योजना संथ गतीने सुरु होती याकडे त्यानी लक्ष वेधले. आत्ता ज्या प्रकारे कामे सुरु आहे. एप्रिल अखेरपर्यंत ही योजना कार्यान्वीत होईल असा विश्वास आमदार राजू पाटील यांनी व्यक्त केला आहे.

पान २ वर

## मिरा-भाईदरच्या आयुक्तांनी कत्तलखान्याची निविदा केली रद्द

● **भाईदर, सुचिता देशमुख :**



मिरा-भाईदर महापालिकेने प्रस्तावित अद्यावत कत्तलखान्यासाठी राज्य शासनाकडून 50 कोटींचा निधी मंजूर करण्यात आल्याने पालिकेने त्याची निविदा प्रसिद्ध केली. त्याला माजी आ. नरेंद्र मेहता व आ. गिता जैन यांनी तीव्र विरोध दर्शवित मेहता यांनी निविदा रद्द न केल्यास पालिका मुख्यालयाच्या इमारतीवरून उडी घेत जीव देण्याचा इशारा आयुक्तांना दिला. तर जैन यांनी मेहता यांच्यावर स्टंटबाजीचा आरोप केल्याने कत्तलखान्याचा मुद्दा चांगलाच तापला होता. अखेर सोमवारी (दि.7) मेहता व जैन यांनी आयुक्त संजय काटकर यांची भेट घेतल्यानंतर ती निविदा रद्द केल्याचे आयुक्तांकडून जाहीर करण्यात आल्याने मेहता यांची उडी स्थगित झाल्याची चर्चा शहरात रंगू लागली.

पान २ वर

## निवडणुकीसाठी राज्यातील पोलीस अधिकाऱ्यांना विशेष प्रशिक्षण

● **नाशिक, सचिन कदम :**



आगामी विधानसभा निवडणूक शांततेत व सुरळीतपणे पार पाडण्यासाठी राज्यातील २०० पेक्षा अधिक पोलीस अधिकाऱ्यांना मुख्य निवडणूक आयुक्त एस. चोकलिंगम यांच्यासह पश्चिम बंगाल व तामिळनाडूतील निवडणूक अधिकाऱ्यांनी महाराष्ट्र पोलीस प्रबोधिनीत विशेष प्रशिक्षण दिले. हे अधिकारी नंतर आपल्या कार्यक्षेत्रात शिबीर आयोजित करून इतरांना प्रशिक्षित करतील. राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी चोकलिंगम, तामिळनाडूचे मुख्य निवडणूक अधिकारी सत्यब्रत साहू आणि पश्चिम बंगालचे आरिझ आफताब यांनी विविध विषयांवर पोलीस अधिकाऱ्यांशी संवाद साधला. उपनिरीक्षक ते उपअधीक्षक दर्जाचे अधिकारी या विशेष प्रशिक्षणात सहभागी झाले होते. विधानसभा निवडणूक मुक्त व निष्पक्षपणे पार पाडण्यासाठी पोलिसांना निवडणूक प्रक्रिया, आयोजन, त्यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्यांबाबत नियम व कायद्यांची जाण असणे आवश्यक आहे. यासाठी या विशेष प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आल्याचे निवडणूक अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले. निवडणूक काळात पोलीस अधिकाऱ्यांवर विविध प्रकारची जबाबदारी असते. संवेदनशील मतदान केंद्र शोधणे, कायदा व सुव्यवस्था राखणे, निवडणुकीपूर्वी प्रतिबंधात्मक कारवाई, निवडणुकीवर पैसा व दबावतंत्राचा प्रभाव पडणार नाही, याची दक्षता घेणे आदी कामे करावी लागतात.

पान २ वर

## यश हवे तर आत्मपरीक्षण करून स्वत:चे बलस्थान आणि उणिवा ओळखा', उपजिल्हाधिकारी वैष्णवी बावस्कर यांचा सल्ला

● **नागपूर, नितीन देवळेकर :**



'एमपीएससी'ची तयारी करताना एक दिवस दहा तास आणि पुढचे चार दिवस दोन तास अभ्यास करून यश मिळवता येत नाही. ध्येय ठरवून अभ्यास करावा लागतो. आपल्याला या परीक्षेसाठी किती वर्षे द्यायची आहेत हे आधीच निश्चित हवे. आत्मपरीक्षण करून आपल्यातील शक्ती आणि उणिवा ओळखल्या तरच यश मिळवता येईल, असे मत 'एमपीएससी'द्वारे उपजिल्हाधिकारी म्हणून निवड झालेल्या आणि राज्यात मुलींमधून पहिल्या आलेल्या वैष्णवी बावस्कर यांनी व्यक्त केले. वैष्णवी यांनी सांगितले की, विदर्भात 'एमपीएससी'च्या अभ्यासासाठी पूरक असे वातावरण नाही. शिवाय इथल्या विद्यार्थ्यांचा या परीक्षांकडे फारसा ओढाही दिसत नाही. बहुतांश विद्यार्थी बँक, पोलीस भरती किंवा खासगी क्षेत्राकडे वळतात. ज्यांना खरच अधिकारी व्हायचे आहे अशी मुले पुण्याला जातात. मात्र, तुमच्यात जिद्द आणि चिकाटी असेल तर नागपूरमध्ये राहूनही अभ्यास करता येतो. 'एमपीएससी' उत्तीर्ण होण्यापूर्वी मी कधी पुणे पाहिलेसुद्धा नव्हते. संपूर्ण तयारी इथेच राहून केली. 'एनसीईआरटी' आणि राज्य मंडळाची सर्व पुस्तके वारंवार वाचून काढली.

पान २ वर

## संपादकीय

संपादक - राकेश शंकर गोरे

# चिनी अध्यक्षपत्नीचे वाढते प्रस्थ

कडक राजकीय शिस्तीच्या चीनमध्येही नातेवाईकशाही आहेच, त्यात या राष्ट्राध्यक्षपत्नी संगीत-नृत्य पथकात असल्याने त्यांना प्रसिद्धी अमाप मिळते आहे. चिनी प्रसारमाध्यमे एकतर सरकारी वा दबलेली आहेतच, पण व्यवस्थेला वळसा घालून खुशमस्करेगिरीची लागण चीनला झाली आहे का ? . चीनचे अध्यक्ष क्षी जिनपिंग यांनी आपल्या पत्नी पेंग लियुआन यांना चिनी कम्युनिस्ट पार्टी'च्या (सीसीपी) मध्यवर्ती समितीची धोरणे ठरवणाऱ्या पॉलिटब्यूरोमध्ये पदोन्नती देण्याची योजना आखल्याची अफवा चीनमध्ये गेल्या काही वर्षांपासून कायम आहे.

असे पाऊल धाडसी, निरंगल तसेच 'सीसीपी' मधल्या ज्येष्ठ कनिष्ठ अशा सर्वच निष्ठावंतांना अस्वस्थ करण्याची शक्यता आहे; परंतु जिनपिंग यांनी आतापर्यंत कधीही पायंडे मोडण्यास मागेपुढे पाहिलेले नाही; त्यामुळे पुढे काय होईल कुणी सांगावे ? या प्रश्नाला, या चर्चेला दुजोराच देणारा अहवाल 'पीपल्स डेली' या वृत्तपत्रात २० ऑगस्ट रोजी प्रकाशित झाला. चिनी कम्युनिस्ट पक्षाच्या या अधिकृत मुखपत्राने चीन-भेटीस आलेले व्हिएतनामी कम्युनिस्ट पक्षाचे सरचिटणीस आणि व्हिएतनामी अध्यक्ष टू ला यांच्या पत्नी न्गो फुओंग लाय यांनी १९ ऑगस्ट रोजी बीजिंगमध्ये पेंग लियुआन यांची भेट घेतल्याचा जरा जास्तच सविस्तर वृत्तान्त प्रकाशित केला, हे अनेकांच्या नजरेस येणारे ठरले. पेंग लियुआन आणि गो फुओंग लाय या दोघींच्या भेटीवर आधारित छोटेखानी लेखच होता हा. तोही छायाचित्रासह त्यात पेंग लियुआन यांनी, 'चीन आणि व्हिएतनाम हे पर्वत आणि नद्यांनी जोडलेले मैत्रीपूर्ण शेजारी आहेत आणि दोन्ही देशांमध्ये संस्कृती सामायिक आहे" असे न्गो फुओंग लाय यांना सांगितल्याचा उल्लेख होता तसेच या व्हिएतनामी राष्ट्राध्यक्षपत्नीस चिनी राष्ट्राध्यक्षपत्नीने चिनी ऑपेरा, नृत्य, लोकसंगीत आणि इतर कार्यक्रमांसाठी आमंत्रित केल्याचा तपशीलही होता. या स्वागताबद्दल व्हिएतनामी राष्ट्राध्यक्षपत्नींनी चिनी राष्ट्राध्यक्षपत्नी पेंग लियुआन यांचे आभार तर मानलेच, पण "मुली आणि महिलांच्या शिक्षणाच्या प्रगतीसाठी युनेस्कोच्या विशेष दूत म्हणून पेंग यांच्या सकारात्मक योगदानाबद्दल कौतुक व्यक्त केले" असाही उल्लेख पीपल्स डेलीने केला.

एकंदर पेंग लियुआन यांना आणि त्यांच्या कामाला प्रसिद्धी मिळवून देणाऱ्या या अहवालातून त्यांचे महत्त्व वाढवण्याचा उद्देश दिसत होता. त्यात क्षी जिनपिंग यांचा उल्लेख नव्हता, हेही विशेष. पेंग लियुआन या क्षी जिनपिंग यांना 'लष्करातील वरिष्ठ नियुक्त्यांसाठी छाननीच्या कामात मदत करणार' असल्याची बातमी हाँगकाँगहून प्रकाशित सिन्ग ताओ वृत्तपत्राने गेल्या वर्षीच्या मे महिन्यात दिली होती. पेंग लियुआन यांना सेंट्रल मिलिटरी कमिशन (सीएमसी) च्या तशा गोपनीयच असलेल्या 'परीक्षा आणि मूल्यमापन आयोगा'चे सदस्यपद देण्यात आल्याचेही त्यात म्हटले होते. 'सिन्ग ताओ ने या बातमीसह, समाजमाध्यमांवर 'व्हायरल' होत असलेली एक प्रतिमाही छापली त्यात ६१ वर्षीय पेंग लियुआन लष्करी गणवेशात, लष्करी शैक्षणिक संस्थेची तपासणी करताना दिसत आहेत. पेंग लियुआन लष्करात आहेतच. १९८० मध्ये त्यांच्या लष्करी कारकीर्दीची सुरुवात झाली आणि आजही त्यांना लष्करी अधिकारीपदावरून निवृत्त करण्यात आलेले नाही. पण आता त्या चिनी लष्करातील ('पीपल्स लिबरेशन आर्मीतील) नियुक्त्यांवर देखरेख ठेवणार, अशी अटकळ यावरून पसरली. त्यासाठी त्यांना लेफ्टनंट जनरल म्हणून पदोन्नती देण्यात आली आहे की नाही हे मात्र अद्याप अस्पष्ट आहे. पेंग लियुआन या चिनी लष्कराच्या (पीएलए) बिगर-लढाऊ विभागातच प्रथमपासून होत्या आणि आताही तेथेच आहेत. चिनी लष्कराच्या संगीत व नृत्य विभागात आता त्यांच्याकडे 'मेजर जनरल' पद असल्यामुळे, पीएलएतील अधिकाऱ्यांशी त्या परिचित आहेत. भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली पीएलए रॉकेट फोर्सच्या अर्धा डझनसह एक डझनहून अधिक जनरल अधिकाऱ्यांना अचानक 'काढण्यात आल्याने पीएलएच्या वरिष्ठ पातळीवरील पदे रिक्त आहेतच, त्यांसाठी निवड कोणाची होणार, याबद्दल तर्कवितर्क सुरू असतानाच निवडीच्या कामात राष्ट्राध्यक्षपत्नी लक्ष घालणार असल्याची बातमी हाँगकाँगहून आली. वरिष्ठ पदांवरून काढलेल्यांपैकी अनेकांची नियुक्ती खुद्द क्षी जिनपिंग यांनीच केली होती. त्यांच्यामध्ये चिनी कम्युनिस्ट वरिष्ठ घराण्यातले वारसदार आणि जिनपिंग यांचा घरोबा असलेले माजी संरक्षणमंत्री ली शांगफू आहेत. डेंग झियाओपिंग यांचे नातू आणि पीएलएच्या पायदळाचे उपप्रमुख (लेफ्टनंट जनरल) डेंग झिपिंग यांच्यावरही चौकशीचा फेरा आला होता. या बड्या व्यक्तींच्या छाननीचे काम पेंग लियुआन करणार, असे प्रसारमाध्यमांचे म्हणणे आहे... वाटचाल १९८० पासून सुरू झाली. पण १९८४ मध्ये त्यांना थेट पॉलिटब्यूरोशी संबंधित संगीत-नृत्य पथकात बढती देण्यात आली. मग पुढल्याच वर्षी (जुलै १९८५) त्यांना कम्युनिस्ट पक्षातही स्थान देण्यात आले.



## आजची चित्रोळी

गलितगात्र झाला तरी तो
खंबीर पाठीं ती उभी !
ज्याला सर्वस्व अर्पिले आहे
त्याचीच ती बनून छबी !!

**मुकुंद कुलकर्णी, कन्नमवार नगर, विक्रोळी, मुंबई**

पान १ वरून...

### रामभक्तांसाठी अयोध्येत उभारणार महाराष्ट्र भवन...

प्रभू रामांचे मनोभावे दर्शन भाविकांना करता यावं, तसंच आयोध्येतील प्रभू रामांच महत्त्व काय होतं याची माहिती भाविकांना मिळावी या हेतूने महाराष्ट्र भवन उभारणार असल्याचं सांगितलं आहे. राम मंदिर हे देशातील तमाम हिंदूसाठी अभिमानाची बाब आहे. या भव्य मंदिराची उभारणी झाल्यानंतर दर्शनासाठी जगाच्या कानाकोपऱ्यातील पर्यटक मंडळी तसंच राम भक्तांची दररोज मोठ्या प्रमाणात गर्दी होत असते. म्हणूनच लांबून येणाऱ्या भक्तांची योग्य रीतीने सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी हे महाराष्ट्र भवन उभारण्यात येत आहे.
हिंदुत्वाचा मानबिंदू असलेले हे अयोध्येतील पवित्र राम जन्मभूमी मंदिर जगभरातील हिंदूंना नेहमीच एक सकारात्मक ऊर्जा देत असते. यावेळी बालकराम मंदिराच्या उर्वरित बांधकामाचीही पाहणी चव्हाण यांच्यासह मान्यवरांनी केली.भूमिपूजन झाल्याने आता भवनाच्या कामाला लवकरच सुरुवात केली जाईल. महाराष्ट्रामधून आलेल्या रामभक्तांची गैरसोय होणार नाही यासाठी महाराष्ट्र शासनाचे हे महत्वाकांक्षी पाऊल आहे अशी प्रतिक्रिया अयोध्या परिसरातील मराठी बांधवांनी व्यक्त केली.

### सरेंडर व्हा, नाही तर.. बोपदेव घाट बलात्कार...

पुण्यातील बोपदेव घाटात टेबल पॉइंट परिसरात एका मुलीवर तीन आरोपींनी सामूहिक बलात्कार प्रकरणी समाजात तीव्र प्रतिक्रिया उमटल्या आहेत. आरोपीला अटक करून त्यांना कठोर शिक्षा करण्याची मागणी केली जात आहे. आरोपींचा शोध घेण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखा, वानवडी, हडपसर, लोणी काळभोर व कोंढवा पोलीसांचे ६० पेक्षा अधिक पथके आरोपींच्या मागावर आहेत. मात्र, अद्याप पोलिसांना त्यांचा शोध घेण्यात यश आलेले नाही. त्यामुळे पुणे पोलिसांनी आरोपींना सरेंडर व्हा नाही तर एन्काउंटर करू असा इशारा दिला आहे. तसेच तपास पथकाला आरोपी जिथे सापडतील तिथे सोडू नका, असे आदेश देखील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिल्याची माहिती आहे.

पुणे पोलिसांनी खबऱ्यांचे नेकवर्क कामाला लावले आहे. ज्या पोलिसांचे खबऱ्यांचे नेटवर्क चांगले आहे, अशांना देखील पोलिस अधिकाऱ्यांनी कामाला लावले आहे. तसेच आरोपींना शरणागती पत्करावी अन्यथा एन्काउंटरला सामोरे जावे लागेल, असा संदेश त्यांना देण्यास सांगितला आहे.

पुणे पोलिसांनी जिथे सीसीटीव्ही आहे, त्या ठिकाणचे चित्रण तपासण्यास सुरुवात केली आहे. तसेच जवळील गावात देखील आरोपींचा शोध घेतला जात आहे. काही गावकऱ्यांची बैठक घेऊन त्यांना आरोपींचे रेखचित्र दाखवून विचारपूस केली जात आहे. तसेच आरोपींची माहिती देणाऱ्यास १० लाखांचे बक्षीस देखील दिले जाईल अशी घोषणा करण्यात आली आहे. या सोबतच गावातील एखाद्या मंदिरात किंवा हॉटेलमध्ये कोणी अनोळखी व्यक्ती येऊन थांबत असल्यास त्याची माहिती पोलिसांना द्यावी, असे आवाहन देखील पोलिसांनी नागरिकांना केले आहे. आरोपी पुण्यातून पळून जाऊ नयेत, यासाठी पुण्याबाहेर जाणाऱ्या सर्व मार्ग, रेल्वे आणि बसेसवर विशेष लक्ष ठेवण्यात येत आहे. साध्या वेशातील पोलीस अगदी देशी दारूच्या दुकानात ग्राहक म्हणून उभे आहेत. याशिवाय वेश्याव्यवसाय चालणाऱ्या भागात येणाऱ्या लोकांवरही नजर ठेवण्यात येत आहे.

पुणे पोलिसांनी आता पर्यंत ३ हजार पेक्षा अधिक मोबाइल डेटा तपासला आहे. तसेच या मोबाइलच्या पत्त्यानुसार पोलिसांनी माहितीचे तांत्रिक विश्लेषण सुरू केले आहे. या सोबतच २५० पेक्षा अधिक आरोपींची चौकशी देखील करण्यात आली आहे.

### अजित पवार यांची अखेर बारामतीमधून उमेदवारी...

तुमच्या मनातील उमेदवार बारामतीत असेल फक्त घडाळयाचे चिन्ह दाबा आणि त्याला विधानसभेत पाठवा, असे अजित पवार म्हणाले. परंतु जनतेच्या मनात उमेदवार कोण आहे, यासाठी मला सर्वेक्षण करावे लागेल, अशी फटकेबाजीही त्यांनी केली. महायुतीचे 230 जागांवर एकमत झाले आहे. उर्वरित जागांवर लवकरच चर्चा पूर्ण होईल. कुठेही महायुतीत मतभेद नाही, असे प्रफुल पटेल यांनी सांगितले. प्रत्येक निवडणुकीच्या अगोदर लोक या पक्षातून त्या पक्षात जात असतात. आउटगोइंग आणि इन्कमिंग हा विषय नाही. आज हरियाणाचा निकाल आल्यानंतर आउटगोइंग आणि इन्कमिंगवाले आता विचार करतील, असेही प्रफुल पटेल म्हणाले.

### कल्याण ग्रामीणमधील २७ गावातील...

अमृत योजनेत डीपीआर तयार न करता फक्त टेंडर काढण्याचे काम केले गेले. टाक्याचे लोकेशन निश्चिन केले गेले नव्हते. ज्या जागा निश्चीत केल्या होत्या. त्या जागा आपल्या ताब्यात नव्हत्या. त्यामुळे अनेक अडचणी आल्या. अंदाधुंद काम सुरु होते. काही ढिसाळ नियोजनामुळे तर काही मुद्दाम अडचणी आल्या. आत्ता समाधानकारक परिस्थिती दिसते. लवकर अमृत योजना कार्यान्वीत होईल असे विधानस मनसे आमदार राजू पाटील यांनी अमृत योजने अंतर्गत सुरु असलेल्या कामाचा पाहणी दौरा दरम्यान केले आहे. येत्या विधानसभा निवडणूकीत ठाकरे गटात सुरु असलेल्या एंट्रीवरूनही विरोधाकांना चिमटा काढला आहे. यावेळी मनसे आमदार राजू पाटील यांनी हरीणाया आणि जम्मूकश्मीर मधील निवडणूक निकालावर भाष्य केले आहे. जम्मूकश्मीरमध्ये निकाल अपेक्षित होता. हरियाणात भाजप येईल असे वाटले नव्हते.मात्र हरियाणात भाजपने काय जादू केली आहे. ते माहीत नाही. महाराष्ट्रात ही जादू चालते का हे पाहावे लागणार आहे.

### निवडणुकीसाठी राज्यातील पोलीस...

दलात नवीन नियुक्ती अथवा आणि ज्यांना बढती मिळाली, त्याना निवडणुकीसाठी अधिकारी म्हणून नवीन जबाबदारी आहे, अशा सर्वांना या प्रशिक्षणाचा लाभ होईल, असा विश्वास अधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

### यश हवे तर आत्मपरीक्षण करून स्वत:चे...

खूप पुस्तके वाचली नाहीत किंवा बाजारात आलेले प्रत्येक नवीन पुस्तक विकतही घेतले नाही. हल्ली बाजारात नवीन पुस्तके आली की त्याचे फार आकर्षण असते. मात्र, पुस्तकांचे केवळ मुखपृष्ठ आणि त्यातील मांडणी तेवढी बदललेली असते. मजकूर सारखाच असतो. त्यामुळे अशा आकर्षणाला बळी न पडता स्वत: टिपण काढा, असा सल्ला वैष्णवी यांनी दिला. प्राथमिक शिक्षण महापालिकेच्या तर माध्यमिक शिक्षण केशवनगर शाळेत झाले. सुरुवातीला डॉक्टर बनायची खूप इच्छा असल्याने बारावीत विज्ञान शाखेतून शिक्षण घेतले. मात्र, 'नीट'मध्ये चांगले गुण न मिळाल्याने ही संधी हुकली. त्यानंतर फॉरेन्सिक विज्ञान शाखेतून बी.एस्सी. अंतिम वर्षापासून (२०१९) स्पर्धा परीक्षेची तयारी सुरू केली. करोना काळात अभ्यासाला चांगली संधी मिळाली. सोबत चांगला समूह मिळाल्याने त्याचा खूप फायदा झाला. २०२०, २०२१ आणि २०२२ अशी तीनदा परीक्षा दिली. मुलाखतीपर्यंत गेले, मात्र राज्यसेवा परीक्षेत यश आले नाही. दरम्यान, २०२२ ला संयुक्त परीक्षेतून सहाय्यक कक्ष अधिकारी पदावर निवड झाली. तरीही २०२३ ची राज्यसेवा परीक्षा दिली. यात यश मिळाले आणि उपजिल्हाधिकारी पदावर निवड झाली, असे वैष्णवी यांनी सांगितले. 'एमपीएससी' उत्तीर्ण होण्यासाठी योग्य दिशा आणि मार्गदर्शन हवे. मला विभा जाधव आणि विशाल नागपुरे या दोघांचे मार्गदर्शन लाभले. 'एमपीएससी'ची तयारी करणाऱ्या प्रगती जगताप या आदर्श होत्या. २०२० मध्ये त्यांची निवड झाली. त्यांचे वेळोवेळी मार्गदर्शन लाभले. 'एमपीएससी' परीक्षेत अपयश येण्याची शक्यता असतेच. त्यामुळे सकारात्मक लोक सभोवताली हवे. त्यामुळे नैराश्य येत नाही. तीन ते चार प्रयत्नात पूर्व परीक्षाही उत्तीर्ण होता येत नसेल तर दुसऱ्या परीक्षेचा विचार करावा, असा सल्ला वैष्णवी यांनी दिला.
२०१९ ला वडिलांचे निधन झाले. आई रुग्णालयात नोकरीला होती. तिने कायम साथ दिल्याने एमपीएससीत यश मिळवता आले. मी सरकारी अधिकारी व्हायचेच असा निर्णय घेतला होता. दरम्यान, घरीच शिकवणी घेतली. याचाही मला अभ्यासात फायदा झाला. राज्यसेवा देत असताना सरळसेवा परीक्षाही दिल्या. वनविभाग, तलाठी आणि नगरपरिषद अशा तीन ठिकाणी निवड झाली होती. पुढे संयुक्त परीक्षा आणि एमपीएससीतही यश मिळवले. त्यामुळे कुठलीच परीक्षा कमी नसून प्रत्येकातून नवीन काहीतरी शिकता येते. एखादी नोकरी मिळाली तरी आपण स्थिर होतो. त्यामुळे परीक्षा देत राहावे. भविष्यात मला विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करायचे असून पाच अधिकारी तरी घडवणारच, असा संकल्पही वैष्णवी यांनी केला.

### मिरा-भाईंदरच्या आयुक्तांनी कत्तलखान्याची...

उत्तन परिसरात राज्य शासनाने एमएमआरडीएच्या माध्यमातून विशेष पर्यटन क्षेत्र जाहीर केले आहे. त्याचा विकास आराखडा एमएमआरडीएने 2017 मध्ये लागू केला. त्यात सर्वे क्रमांक 282 हिस्सा क्रमांक 4 वरील 1 हजार 690 चौरस मीटर जागेत कत्तलखाना प्रस्तावित करण्यात आला. मात्र एमएमआरडीएने लागू केलेल्या विकास आराखड्याची मुदत 2022 मध्ये संपुष्टात आल्यानंतर पालिकेने एमएमआरडीएच्याच निर्देशानुसार ऑक्टोबर 2022 मध्ये प्रस्तावित कत्तलखान्याच्या विकासाकरीता तेथील जागा मालकांना जमीन संपादनासाठी नोटीसा पाठविल्या. यामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप पसरल्याने त्यांनी प्रस्तावित कत्तलखान्याला तीव्र विरोध दर्शविला. अगोदरच उत्तनमध्ये पालिकेचा घनकचरा प्रकल्प सुरु असून त्यामुळे तेथील ग्रामस्थ त्रस्त आहेत. अशा परिस्थितीत ग्रामस्थांच्या माथी कत्तलखान्याचा प्रकल्प मारून त्यांचे आरोग्य नष्ट करण्याचा प्रयत्न पालिका व शासन करीत असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून करण्यात आला.
तर या परिसरात प्रसिध्द वेलंकनी माता तीर्थमंदिर, हिंदुस्थानातील सर्वात मोठे व प्रसिद्ध पॅगोडा, रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी, देशातील न्यायाधीशांचे प्रशिक्षण केंद्र, चिमाजी आप्पा स्मारक, प्रख्यात धारावी मंदीर, जंजिरा किल्ला व इतर प्राचीन वास्तु असल्याने या परिसरातील शेतकरी, ग्रामस्थ व पर्यावरण वादींचा या कत्तलखान्याला तीव्र विरोध असल्यामुळे येथील कत्तलखाना रद्द करण्यात यावा, अशी मागणी त्यावेळी मेहता यांच्यासह उत्तन ग्रामस्थांकडून करण्यात आली. यानंतर पालिकेने 28 ऑक्टोबर 2022 रोजी प्रसिद्ध केलेल्या प्रारूप नवीन विकास आराखड्यात भाईंदर पश्चिमेकडील गणेश देवल नगर येथील बंदावस्थेत असलेल्या मलनि:स्सारण केंद्राच्या परिसरात कत्तलखान्यासाठी आरक्षण क्रमांक 31 प्रस्तावित केले. या परिसरात सुद्धा जैन धर्मियांचे तीर्थक्षेत्र बावन जिनालय असून इतर धर्मियांची सुद्धा प्रसिध्द मंदिरे असल्याने येथील भर लोकवस्तीच्या ठिकाणी प्रस्तावित कत्तलखान्याला देखील स्थानिकांनी तीव्र विरोध दर्शविला. कत्तलखान्याचे आरक्षण रद्द करण्यासाठी पालिकेने जिल्हा नगररचनाकार यांना तात्काळ पत्रव्यवहार करण्याची मागणी त्यावेळी मेहता यांनी तत्कालीन आयुक्त दिलीप ढोले यांच्याकडे केली. तसेच उत्तनमधील प्रस्तावित कत्तलखान्याच्या जमीन संपादनासाठी तेथील शेतकऱ्यांना व जमीन मालकांना पाठविण्यात आलेल्या नोटीसा रद्द करून कत्तलखान्याचे आरक्षण देखील रद्द करण्याची मागणी त्यांनी केली. यानंतर तब्बल दोन वर्षांनी आ. प्रताप सरनाईक यांनी 10 जून 2024 रोजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे पत्रव्यवहार केला. त्यात नमूद केल्याप्रमाणे नगरविकास विभागाने महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोयी-सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतूद या योजनेंतर्गत पालिका हद्दीमध्ये अद्यावत कत्तलखाना उभारण्यासाठी 50 कोटींचा निधी मंजूर केल्याचे 5 सप्टेंबर रोजी शासकीय आदेश जारी केला. यानुसार पालिकेने 3 ऑक्टोबर रोजी त्याची निविदा प्रक्रिया सुरु केली.
त्याची माहिती मिळताच मेहता व जैन यांनी त्याला तीव्र विरोध दर्शवित त्याची निविदा रद्द करण्याची मागणी केली. तसेच यावरून मेहता व जैन यांच्यात आरोप प्रत्यारोप सुरु झाले असतानाच मेहता यांनी निविदा रद्द न केल्यास पालिका मुख्यालयाच्या इमारतीवरून उडी मारण्याचा इशारा आयुक्तांना दिला. त्यावर जैन यांनी मेहता यांच्यावर स्टंटबाजीचा आरोप केला. या दोन्ही आजी-माजी आमदारांनी सोमवारी आयुक्तांची भेट घेत निविदा रद्द करण्याची मागणी केली असता आयुक्तांनी निविदा रद्द केल्याचे जाहीर केले. यामुळे मेहता यांची उडी देखील स्थगित झाल्याची चर्चा शहरात रंगू लागली आहे.

### मुंबईतील नद्या आणि समुद्र होणार एकदम...

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने प्लास्टिक प्रदूषण आणि कचरा कमी करण्यासाठी नेदरलँड आणि भारत क्लिन रिव्हर्स फाउंडेशन मुंबई यांच्याशी करार केला. नुकत्याच झालेल्या कार्यक्रमात महासागर स्वच्छतेच्या सामंजस्य करारावर सह्या करण्यात आल्या. ओशन क्लिनअप ही कंपनी मुंबईतील नद्या आणि समुद्रातील प्लॅस्टिक प्रदूषणाची साफसफाई करणार आहे.

मुंबईतील समुद्र आणि नद्यांतील प्रदूषणाचा प्रभाव कमी केला जाणार आहे. नदीतील प्लास्टिक रोखण्यासाठी प्रयत्न केले जातील. यासोबतच समुद्रामध्ये अगोदर जमा झालेले प्लास्टिक काढून समुद्र स्वच्छ करणे हे अशोन क्लिनअपचे उद्दिष्ट आहे. यातून एक मॉडेल बनवण्यात सरकारचा मानस आहे. या कामाला सुरुवात झाली असून पहिला प्रकल्प मुंबईत सुरू करण्यात आला आहे.प्लास्टिक क्लिन करण्यासाठी वैज्ञानिक पद्धतीने काम केले जाणार आहे.मुंबई पालिकेसह इतर पालिकांना लागणारी मदत सरकारकडून केली जाणार आहे. कचरा कुठून येतो? कुठे जातो? याच ट्रॅकिंग केले जाणार आहे.

समुद्रात कचरा जायला सहा महिने लागतात तर नदीच्या पात्रात तो दहा वेळा वर खाली होतो. मुंबईच्या नद्या आणि मुंबईतील परिसराला याचा खूप मोठा फायदा होईल आणि स्वरूप बदलेल, असे यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. यासंदर्भात प्रदूषण महामंडळाला काम करण्याच्या सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्या आहेत. स्वच्छ महासागराकडे नेणाऱ्या स्वच्छ नद्या पाण्याच्या आसपास राहणाऱ्या समुदायांना पर्यटन आणि शाश्वत मासेमारी याच्यासह अनेक विविध मार्गांसाठी लाभदायी ठरणार असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले.

### भिवंडीतील पोलीस चौक्या अलर्ट मोडवर

गणेश विसर्जन मिरवणुकीत निर्माण झालेल्या तणावानंतर भिवंडीतील संपूर्ण पोलीस यंत्रणा अलर्ट मोडवर राहिली असून गणेशोत्सवानंतर येणाऱ्या प्रत्येक सणांमध्ये शहरात पोलीस गस्त वाढलेली आहे. त्यामुळे सध्या नवरात्री उत्सवात रात्री शहरातील विविध भागात पोलीस चौकांमध्ये पोलीस जागता पहारा देत आहेत.

पोलीस चौकांना योग्य ती व आवश्यक त्या सोयी सुविधा पोलीस प्रशासना व सेवाभावी संस्थांकडून पुरविण्यात येत आहेत. नारपोली, शांतीनगर, कोनगाव, भोईवाडा, निजामपुरा व भिवंडी शहर ही सहा पोलीस ठाणे येत असून या सहा पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात सुमारे २२ पोलीस चौकी शहरात कार्यरत आहेत. शहरातील मध्यवर्ती ठिकाण असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज चौकातील पोलीस चौकी, त्यानंतर पद्मा नगर येथील पोलीस चौकी तसेच शांतीनगर गैबी नगर या मुस्लिम बहुल मोहल्यांमध्ये असलेल्या पोलीस चौक्यांसह इतर चौक्यांमध्ये पोलीस तळ ठोकून असतात.

# बिग बॉस विजेत्या सूरज चव्हाण चा प्रेरणादायी प्रवास



कलर्स मराठी वाहिनीवर सुरू असलेल्या बिग बॉस या रिॲलिटी शो चा ग्रँड फिनाले रविवारी रंगला आणि या अपेक्षेप्रमाणे सूरज चव्हाण हा या रिॲलिटी शो चा विजेता ठरला. सूरज चव्हाण या शो चा विजेता ठरावा अशी प्रेक्षकांची ईच्छा होती कारण अल्पावधीतच त्याने प्रेक्षकांच्या मनात घर केले होते. त्याचा भोळसट स्वभाव आणि निरागस वागणूक यामुळे प्रेक्षक त्याच्या प्रेमात पडले होते. मनोरंजन क्षेत्रातील अनेक दिग्गज कलाकार या शो मध्ये त्याचे प्रतिस्पर्धी होते त्यामुळे त्याला कोणीच जमेस धरले नव्हते. टीकटॉक वर स्वतःचे काही सेकंदाचे व्हिडिओ बनवून टाकणारा सूरज चव्हाण हा या शो चा विजेता ठरेल असे सूरज वगळता कोणालाच वाटले नव्हते. सूरजला मात्र स्वतः वर विश्वास होता आणि याच विश्वासाच्या जोरावर तो विजेता ठरला. काहीही करून हा शो जिंकायचाच असा विचार करून तो शो मध्ये उतरला आणि त्याने स्वतः ला सिद्ध केले. सूरज बिग बॉस चा विजेता ठरला असला तरी त्याचा इतपर्यंत चा प्रवास सोपा नव्हता. बारामती येथे जन्मलेल्या सूरज चव्हाणचे बालपण अतिशय खडतर अवस्थेत गेले. सूरज चव्हाण लहान असतानाच त्याचे आई वडील वारले. लहानपणीच आई वडिलांचे छत्र हरपलेल्या सूरज चव्हाणचा सांभाळ त्याच्या मोठ्या बहिणीने केला. त्याला एकूण पाच बहिणी आहेत. घरची परिस्थिती हालाखीची असल्याने आठवितच सूरजला शाळा सोडून द्यावी लागली. घरची परिस्थिती हलाखीची असल्याने एक वेळचे जेवण मिळणे देखील मुश्कील त्यामुळे कित्येकदा तो उपाशी किंवा अर्धपोटीच झोपत असे. पोटाची खळगी भरण्यासाठी त्याने मंदिरातील नैवद्य खाऊन दिवस काढले. किशोर वयातच त्याला सोशल मिडियाचे वेड लागले. इतर मुलांसारखे तो ही टिक टॉक या सोशल मीडिया साईट वर स्वतःचे व्हिडिओ काढून टाकू लागला. अल्पावधीतच त्याचे व्हिडिओ लोकप्रिय झाले आणि बघता बघता तो महाराष्ट्रात फेमस झाला तो त्याच्या आगळ्या वेगळ्या शैलीने, त्याचे डायलॉग अक्षरशः वाऱ्या सारखे व्हायरल झाले. गुलिगत धोका, बुक्कित टेंगुळ, झापुक झुपुक, मरीआई पावली या सारखे त्याचे कितीतरी डायलॉग हिट झाले आणि तो टिक टॉक स्टार झाला.
टिक टॉक यू ट्यूब कडून त्याला पैसेही मिळाले पण सुरुवातीला त्याच्या भोळ्या स्वभावामुळे ते त्याच्या पर्यंत पोहचले नाही तरीही त्याची काही तक्रार नव्हती. तो त्याचे व्हिडिओ, रिल्स बनवून प्रेक्षकांसमोर येतच होता. त्याची लोकप्रियता वाढतच होती. त्याच्या याच लोकप्रियतेचा फायदा घेण्यासाठी कलर्स मराठी वाहिनीने त्याला बिग बॉस शो ची ऑफर दिली. सुरुवातीला सूरज बिग बॉसच्या घरात यायला तयार नव्हता. पण कलर्स वाहिनीने त्यांचा हट्ट सोडला नाही अखेर सूरज चव्हाण बिग बॉसच्या घरात यायला तयार झाला आणि आज सूरजने थेट बिग बॉसच्या ट्रॉफी वर नाव कोरत इतिहास घडवला. काही जण त्याच्या या विजयावर प्रश्नचिन्ह उपस्थित करून म्हणतात की बिग बॉस प्रि प्लेंड होतं पण तळागाळातील सर्वसामान्य मुलासासाठी कोण प्लॅन करणार ? कोण त्याचा एवढा विचार करणार ? ते पण एवढ्या मोठ्या कसलेल्या कलाकारांसमोर. सूरज चव्हाण त्याच्या कष्टाच्या आणि जिद्दीच्या बळावर ईथवर पोहचला आहे. आता त्याच्या कष्टाचे चीज झाले असे म्हणावे लागेल. बिग बॉस विजेत्या सूरज चव्हाणचे मनापासून अभिनंदन !!

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

# चार वर्षात ठाणे ते आनंदनगर उन्नत मार्ग

**ठाणे (सुचित शिंदे) :** मुंबई आणि ठाणे शहराच्या वेशीवर असलेल्या नाक्यांवर गेल्या काही वर्षांपासून वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत असून ही समस्या सोडविण्यासाठी घाटकोपर ते आनंदनगर उन्नत पूर्व मुक्त मार्गाची उभारणी करण्यात येणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते भुमीपुजन झालेल्या या प्रकल्पाचे काम चार वर्षात पुर्ण केले जाणार आहे. या प्रकल्पामुळे दक्षिण मुंबई ठाण्याशी जोडण्याबरोबरच नवी मुंबई, पूर्व उपनगरे आणि त्या पलिकडील भागाशी थेट पोहोचमार्ग उपलब्ध होणार आहे. तसेच या प्रकल्पामुळे ठाणे आणि मुंबईचा प्रवास वेगवान होण्याबरोबर इंधन आणि प्रवास वेळेत बचत होणार असल्याचा दावा करण्यात येत आहे.

देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबई शहराला खेटूनच ठाणे शहर आहे. या शहराचे गेल्या काही वर्षात झपाट्याने नागरिकरण झाले आहे. ठाणे शहरातील अनेक नागरिक कामानिमित्त दररोज मुंबईत जातात. या नागरिकांची संख्या मोठी असून ते वाहतूकीसाठी रेल्वे आणि रस्ते मार्गाचा वापर करतात. परंतु वाहनांच्या संख्येत मोठी वाढ झाल्याने आणि त्या तुलनेत रस्ते अपुरे पडू लागल्याने कोंडीची समस्या निर्माण होत आहे. या दोन्ही शहरांच्या वेशीवर वाहतूक कोंडी होते. या कोंडीमुळे इंधन आणि वेळ वाया जात असल्याने नागरिक हैराण होते. त्यावर उपाय म्हणून राज्य शासनाने घाटकोपर ते आनंदनगर उन्नत पूर्व मुक्त मार्ग उभारण्याचा निर्णय घेतला होता. एमएमआरडीएमार्फत प्रकल्पाचे काम केले जाणार आहे. या प्रकल्पाचे भुमीपुजन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते शनिवारी ठाण्यातील कार्यक्रमात करण्यात आले. यामुळे प्रकल्पाच्या कामाला लवकरच सुरूवात होणार असून या प्रकल्पाचे काम पुर्ण करण्याची मुदत सप्टेंबर २०२८ आहे. त्यामुळे चार वर्षानंतर उन्नत पूर्व मुक्त मार्ग वाहतूकीसाठी उपलब्ध होण्याची चिन्हे आहेत.



या प्रकल्पामुळे मुंबईच्या बाह्य रिंग रोडचा एक महत्त्वपूर्ण टप्पा पूर्ण होईल. या टप्प्यात नरिमन पॉइंट, वांद्रे-वरळी सागरी सेतू, वर्सोवा आणि दहिसर यांसारखी प्रमुख ठिकाणे जोडली जातील. यामुळे संपूर्ण भागातील प्रवास अधिक सुरळीत होईल. हा विस्तार विद्यमान पूर्व मुक्त मार्गाद्वारे आगामी ऑरेंज गेट बोगद्याशी जोडला जाईल. त्यामुळे एक अखंड आणि कार्यक्षम रिंग रोड प्रणाली तयार होईल. या विस्तारित मार्गामुळे दक्षिण मुंबईतील ऑरेंज गेट शहरी बोगदा मार्ग ते कोस्टल रोड ते सांताक्रुज चेंबूर लिंक रोड ते पूर्व द्रुतगती मार्ग असा एक रिंग रूट तयार होत आहे. त्यापुढे हा मार्ग जोगेश्वारी विक्रोळी लिंक रोड कडे जोडला तर आणखी एक रिंग रूट तयार होतो. तसेच, ठाण्यात मुलूंड, ऐरोली, मुंब्रामार्गे जाणारा रस्ता इथेही एक भविष्यात रिंग रूट तयार होईल, अशी माहिती एमएमआरडीच्या सुत्रांनी दिली.

### प्रकल्पाची वैशिष्ट्ये

या प्रकल्पामुळे मुंबई आणि ठाणे या दोन शहरातील वाहतूक कोंडीची समस्या कमी होऊन नागरिकांचा प्रवास वेगवान होईल. प्रवासाचा वेळ कमी होण्याबरोबरच इंधनाचा वापर कमी होईल. हा विस्तार मुंबई आणि ठाण्याच्या बाह्य रिंग रोडचा एक भाग असणार आहे. त्यामुळे प्रवासासाठीअंतर्गत रस्ते टाळले जाऊन जलद आणि थेट रस्त्यांचे जाळ उपलब्ध होईल. उन्नत पूर्व मुक्त मार्गामुळे रस्त्यांवरील वाहतूकीचा ताण कमी होईल आणि या विस्तार मार्गाशी महत्त्वाचे मार्ग जोडले जातील. जेणेकरून एका मार्गावरून दुसऱ्या मार्गावर जाणे अधिक सुलभ होईल. या प्रकल्पामुळे दक्षिण मुंबई ठाण्याशी जोडली जाणार आहे. नवी मुंबई, पूर्व उपनगरे आणि त्या पलिकडील भागाशी थेट पोहोचमार्ग उपलब्ध होणार आहे.

महत्त्वाचे प्रकल्प तपशील

एकूण लांबीः १३.४० किमी

पूर्णपणे उन्नत कॉरिडॉर

मार्गिकांची संरचना : ३ ३ मार्गिका (एकूण ६ मार्गिका)

रॅम्प्स : ठाणे, ऐरोली जंक्शन आणि कांजुरमार्ग जंक्शन येथे मोक्याच्या ठिकाणी तयार केलेले रॅम्प्स

उन्नत टोल प्लाझा: ५ ५ मार्गिका

प्रकल्प खर्चः ३३१४ कोटी

## लिमिटलेस माइंड अबॅकस व मानसिक अंकगणित स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद




**कल्याण (विशाल कारंडे) :** लिमिटलेस माइंड या संस्थेने अबॅकस व मानसिक अंकगणित स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेत अनेक विद्यार्थ्यांनी भाग घेतला. ज्यामध्ये आठ मिनिटांमध्ये 150 गणिते सोडवण्याचे उद्दिष्ट होते. अनेक विद्यार्थ्यांनी 100 पेक्षा जास्त गणिते सोडवत कौशल्याचे उत्तम प्रदर्शन केले. प्रमुख पाहुण्यांमध्ये माजी नागरसेविका तथा महिला मोर्चा अध्यक्षा वैशाली पाटील, बाल मानसोपचार तज्ञ डॉ. स्वप्नील आहेर, आणि 'मॅजिक एजुकेशन' चे संस्थापक जितेंद्र कपरवान यांचा समावेश होता. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते बक्षीस वितरण समारंभ पार पडला.विविध स्तरांतील विजेते म्हणून उमंग मोरे, आराध्या मोरे, रुचि खेड़ेकर, समर्थ महाजन, मदन चव्हाण, नायरा यलमार, स्वरुप घटोळे, दक्षता बिसने आणि कुश चौधरी या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. लिमिटलेस माइंड या संस्थेच्या संस्थापिका सुरेखा गिरी यांनी या स्पर्धेच्या महत्त्वाबद्दल उपस्थितांना मार्गदर्शन केले.

## पाच मिनटांत अडीच लाखांची रोकड चोरी, पावती घेणे पडले महागात

**नवी मुंबई (धनश्री सट्टा) :** कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये केवळ पाच मिनिटांत एका टेम्पोत ठेवण्यात आलेली अडीच लाखांची रोकड अज्ञात व्यक्तीने चोरी केल्याचे समोर आले आहे. सदर वाहन चालक प्रवेशद्वारावर वाहन लावून प्रवेश पावती घेण्यासाठी उतरला होता. याच केवळ पाच मिनिटांत ही चोरी झाली आहे. याबाबत एपीएमसी पोलीस ठाण्यात अनोळखी व्यक्तीविरोधात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



आशियातील सर्वात मोठी समजली जाणारी कृषी उत्पन्न बाजार समिती नवी मुंबईत असून एवढी मोठी बाजार समिती असली तरी सुरक्षा वाऱ्यावर असल्याचे अनेकदा समोर आले आहे. असाच प्रकार शनिवारी घडला आहे. येथील व्यापारी संतोष खेडेकर यांनी माथाडी कामगार दिनकर साळुंके यांच्याकडे २ लाख ८० हजार रुपयांची रोकड दिली. ही रक्कम सातारामधील धुमाळवाडी येथे राहणारे हनुमंत शिंदे यांना देण्यास सांगितले होते. त्यानुसार धुमाळवाडीला जाणारे टेम्पो चालक व यातील तक्रारदार संतोष फडतरे यांच्याकडे सदर रक्कम साळुंके यांनी दिली. ही रक्कम ठेवलेली पिशवी वाहन चालकाच्या आसनाला मागच्या बाजूने फडतरे यांनी अडकवली. टेम्पो फळ बाजाराच्या प्रवेशद्वारावर लावून नेहमी प्रमाणे फडतरे यांनी प्रवेशिका घेण्यासाठी खाली उतरले आणि प्रवेशिका घेऊन गाडीत बसले. याला केवळ चार ते पाच मिनिटे लागली. मात्र या वेळेत अज्ञात व्यक्तीने त्यांच्या गाडीतील २ लाख ८० हजार रोकड ठेवलेली पिशवी चोरी केली.

जेव्हा फडतरे गाडीत बसले त्यावेळी आसनाला अडकवलेली पिशवी आढळून न आल्याने त्यांनी खूप शोधाशोध केली मात्र पिशवी आढळून न आल्याने चोरी झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यामुळे त्यांनी एपीएमसी पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार दिली. सदर तक्रारीची दखल घेत पोलिसांनी अनोळखी व्यक्तीविरोधात गुन्हा नोंद केला असून सहाय्यक पोलीस निरीक्षक पंडित पाटील हे पुढील तपास करीत आहेत.

## मुंबई विद्यापीठाच्या कबड्डी स्पर्धेत एसएसटी महाविद्यालयाची विजयाची हॅटट्रिक

### आंतर महाविद्यालयीन स्पर्धेत सलग तिसऱ्या वर्षी प्राप्त केले अजिंक्यपद

**कल्याण (आकाश कांबळे) :** मुंबई विद्यापीठ ठाणे झोन स्पोर्ट्स कमिटी आणि वेदांत महाविद्यालय, उल्हासनगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आंतरमहाविद्यालयीन कबड्डी स्पर्धेत एसएसटी महाविद्यालयाच्या पुरुष संघाने सलग तिसऱ्या वर्षी विजयाची परंपरा कायम राखत हॅटट्रिक साधली आहे. अंतिम सामना अत्यंत चुरशीचा ठरला, ज्यामध्ये एसएसटीच्या खेळाडूंनी आपली अद्वितीय कौशल्ये दाखवत अजिंक्यपदावर विजय मिळवला.

याच स्पर्धेत एसएसटी महाविद्यालयाच्या महिला संघानेही उत्कृष्ट कामगिरी करत चतुर्थ क्रमांकावर आपले स्थान पक्के केले. संघाच्या विजयाबद्दल खेळाडूंनी आनंद व्यक्त करत, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पुरस्वानी, क्रीडा शिक्षक प्रा. राहूल अकुल आणि प्रा. पुष्कर पवार यांनी दिलेल्या मार्गदर्शनाबद्दल तसेच खेळासाठी दिलेल्या प्रोत्साहनाबद्दल विशेष आभार मानले. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळेच हे यश शक्य झाल्याचे त्यांनी सांगितले.

## घरगुती गणेशोत्सव सजावट स्पर्धेत तुषार पाटील कुटुंबीयांना प्रथम क्रमांक

### शिवसेना आणि आमदार विश्वनाथ भोईर आयोजित घरगुती गणेशोत्सव सजावट स्पर्धा स्पर्धेचा दिमाखदार पारितोषिक सोहळा संपन्न

**कल्याण (राकेश गायकवाड) :** शिवसेना कल्याण पश्चिम आणि आमदार विश्वनाथ भोईर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या घरगुती गणेशोत्सव सजावट स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिके देण्यात आली. यामध्ये पहिल्या तीन विजेत्यांसह आणखी 20 स्पर्धकांना उत्तेजनार्थ पारितोषिक देऊन गौरवण्यात आले. येथील महाजनवाडी सभागृहात हा दिमाखदार सोहळा संपन्न झाला. गेल्या महिन्यात झालेल्या गणेशोत्सव काळामध्ये ही घरगुती सजावट स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. ज्यामध्ये कल्याण पश्चिम विधानसभा मतदारसंघातील अडीचशेहून अधिक स्पर्धक सहभागी झाले होते.



## ग्रामपंचायत किसळ - पारगाव ने नागरिकांच्या कायदेविषयक समस्या सोडविण्यासाठी घेतली"जनसूनवाई"!

**मुरबाड (यश सावंत)** - नागरिकांच्या मूलभूत अधिकार, मालमत्तेचे अधिकार व आदिवासी, दलित व अल्पसंख्याक यांच्या अधिकाराबाबत जनजागृती करण्यासाठी आणि कायदेविषयक समस्या सोडविण्यासाठी ग्रामपंचायत किसळ - पारगाव, किरीट पी. मेहता स्कूल ऑफ लॉं व लीगल ऐड अँड सपोर्ट सेंटर, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रामपंचायत कार्यालय किसळ येथे "जनसुनावणी" या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात लीगल ऐड अँड सपोर्ट सेंटरच्या टीमच्या वतीने नागरिकांच्या मूलभूत अधिकार, मालमत्तेचे अधिकार व आदिवासी, दलित व अल्पसंख्याक यांच्या अधिकाराबाबत माहिती देण्यात आली. तसेच उपस्थित नागरिकांच्या जमीन मालकी हक्क, वन हक्क, कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा व इतर महत्त्वाच्या कायदेविषयक समस्या उपस्थित वकील महोदय यांनी जाणून त्यांचे निराकरण केले. सदर कार्यक्रमाला एकूण ५० नागरिक सहभागी झाले होते. या कार्यक्रमाचे संयोजन सरपंच डॉ .कविता वरे यांनी केले होते.




## दुबईतील राजे शाही समारंभात मराठमोळ्या श्रीमंत ढोलताशा पथकाला वादनाची सुवर्णसंधी



**कल्याण (गणेश बागडे) :** दुबई हे नाव जरी समोर आले की नजरेसमोर जागतिक पातळीवरील पर्यटन स्थळे येतात. सुंदर देश-ईथली पर्यटन संस्कृती ई. जागतिक स्तरावरील पर्यटकांना आकर्षित करणारी ठरते. या देशाला स्वतः ची अशी संस्कृती आहेच. त्या बरोबरच दुबई म्हणजे राजेशाही पद्धत अजुनही चालू आहे. शेख परिवार म्हणजे दुबईचे शासनकर्ते. याच शेखा मोअझा अल मखतुम दुबई राज्य परिवाराच्या शाही सोहळ्यात भारतीय महाराष्ट्रीयन पारंपरिक वाद्य ढोल-ताशाचे वादन म्हणून श्रीमंत ढोल-ताशा पथकाला आमंत्रण दिले होते. दुबईतील मानाच्या श्रीमंत ढोल-ताशा पथकाने या शाही सोहळ्यात वादन केले. यात महिला वादकांचा देखील सहभाग होताच. आपली संस्कृती अशी भव्यतेने तसेच सुंदर पद्धतीने मांडण्याचे भाग्य या पथकाला लाभले.

## विधानसभा सार्वत्रिक निवडणूक -2024 च्या पार्श्वभूमीवर निवडणूक नोडल अधिकाऱ्यांची आढावा बैठक संपन्न



**ठाणे, (रोहित जैसवार):-** आगामी विधानसभा सार्वत्रिक निवडणूक -2024 च्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अशोक शिनगारे, अपर जिल्हाधिकारी मनिषा जायभाये-धुळे, उप जिल्हा निवडणूक अधिकारी वैशाली माने यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील विधानसभा मतदारसंघातील निवडणूक प्रक्रियेसाठी नेमलेल्या सर्व नोडल अधिकारी, समन्वय अधिकाऱ्यांची निवडणूक पूर्वतयारी आढावा बैठक आज जिल्हा नियोजन समिती सभागृह येथे पार पडली. या बैठकीसाठी अप्पर जिल्हाधिकारी मनिषा जायभाये-धुळे, विजयसिंह देशमुख, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.संदीप माने, उप जिल्हा निवडणूक अधिकारी वैशाली माने, उपजिल्हाधिकारी विकास गजरे, शरद पवार, हरिश्चंद्र पाटील, विकास पाटील, इब्राहिम चौधरी, अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड, विठ्ठल डाके, उपायुक्त उमेश बिरारी, संजय जाधव, कार्यकारी अभियंता सुनिल पाटील, सुनिल महाले, समाजकल्याण सहायक आयुक्त समाधान इंगळे, जिल्हा समाजकल्याण अधिकारी संजय बागूल, निवडणूक खर्च नियंत्रण समितीचे श्री.उबाळे, श्री.सूर्यवंशी, श्री.बुरुडकर आणि जिल्हा माहिती अधिकारी मनोज शिवाजी सानप हे नोडल अधिकारी तसेच निवडणूक शाखा तहसिलदार श्रीमती भगत, प्रदीप कुडाळ, नायब तहसिलदार स्मितल यादव उपस्थित होते.

## नवी मुंबई विमानतळाच्या नामांतराबाबत सकारात्मक चर्चा

### आमच्या मनानं घेतलाय ठाव, विमानतळाला दि. बा. पाटलांचंच नाव






**कल्याण (विवेक गुंजाळ):** स्वर्गीय दि. बा. पाटील यांनी भूमिपुत्रांसाठी केलेल्या संघर्षाची जाणीव पुढच्या पिढ्यांपर्यंत पोहोचावी यासाठी नवी मुंबई विमानतळाला स्वर्गीय दि. बा. पाटील यांचे नाव देण्याचा निर्णय महायुती सरकारने घेतला आहे. याबाबतचा प्रस्ताव पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्र सरकारला पाठवला आहे. त्या प्रस्तावाला केंद्र सरकारची मंजूरी मिळावी यासाठी केंद्रीय मंत्री राम मोहन नायडू आणि केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्यासमवेत दिल्ली मधील केंद्रीय नागरी उड्डाण मंत्रालयात येथे महायुती सरकारच्या शिष्टमंडळाची एक महत्त्वपूर्ण बैठक पार सोमवारी पडली. त्या बैठकीत विमानतळाच्या नामांतराबाबत सकारात्मक चर्चा झाल्याची माहिती सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांनी दिली.

शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी विधानसभेचं सभागृह दणाणून सोडणारे, भूमिपुत्रांच्या न्यायासाठी आंदोलनाची हाक देणारे, प्रकल्पग्रस्तांसाठी साडेबारा टक्क्यांचा विकसित भूखंडाचा मोबदला ही योजना मांडणारे, या योजनेद्वारे नवी मुंबई आणि रायगड मध्ये भूमिपुत्रांचे अस्तित्व टिकवून ठेवणारे, भूमिपुत्रांचे दैवत म्हणजे दि बा पाटील होते असेही चव्हाण म्हणाले. मोदी सरकार हे देशातील भूमिपुत्रांच्या हक्कांसाठी संघर्ष करणाऱ्या नेत्यांचा सन्मान करणारे सरकार असून केंद्र सरकार त्या प्रस्तावाला नक्कीच मंजूरी देईल, असा विश्वास शिष्टमंडळाने व्यक्त केला.\ त्यावेळी माजी मंत्री कपिल पाटील, जगन्नाथ पाटील, माजी खासदार रामशेठ ठाकूर, खासदार धैर्यशील पाटील, खासदार श्रीरंग बारणे, आमदार प्रशांत ठाकूर, माजी खासदार संजीव नाईक, मनसे आमदार राजू पाटील, शेकापचे नेते जे. एम. म्हात्रे, संतोष केणे यांसह ठाणे, रायगड आणि नवीमुंबईतील नेत्यांचा समावेश या शिष्टमंडळात होता.

# प्रीती झिंटाच्या संघाने CPL 2024 मध्ये पटकावले पहिले जेतेपद, इम्रान ताहिरच्या संघाला चारली पराभवाची धूळ

अभिनेत्री प्रीती झिंटा आयपीएलमधील पंजाब किंग्जची सहमालक आहे. तिच्या संघाला अद्याप एकही विजेतेपद मिळवता आलेले नाही. सर्व १७ हंगाम खेळूनही संघ केवळ एकदाच अंतिम फेरीत पोहोचला आहे. मात्र, आयपीएलमध्ये सातत्याने अपयश येत असताना प्रीती झिंटासाठी एक आनंदाची बातमी आली आहे. तिच्या मालकीच्या सेंट लुसिया किंग्ज संघाने कॅरिबियन प्रीमियर लीग म्हणजेच सीपीएल २०२४ चे विजेतेपद पटकावले आहे. या संघाने अंतिम फेरीत गयाना ॲमेझॉन वॉरियर्सचा ६ गडी राखून पराभव करत ट्रॉफीवर नाव कोरले.

कॅरिबियन प्रीमियर लीग २०२४ चा अंतिम सामना रविवारी ६ ऑक्टोबर रोजी गयाना ॲमेझॉन वॉरियर्स आणि सेंट लुसिया किंग्ज यांच्यात गयाना येथील प्रोव्हिडन्स स्टेडियमवर खेळला गेला. सेंट लुसिया किंग्सने हा विजेतेपदाचा सामना जिंकला आणि संघ प्रथमच सीपीएलचा चॅम्पियन ठरला. फाफ डु प्लेसिसच्या नेतृत्वाखालील सेंट लुसिया किंग्जने इम्रान ताहिरच्या नेतृत्वाखालील गयाना संघाचा ६ गडी राखून पराभव केला. यावेळी ४५ वर्षीय कर्णधार इम्रान




ताहिरची जादू चालली नाही, ज्याने २०२३ चे विजेतेपद जिंकून इतिहास लिहिला होता. कारण तो टी-२० लीग जिंकणारा सर्वात वयस्कर कर्णधार ठरला होता.

सेंट लुसिया किंग्ज संघाने पटकावले पहिले जेतेपद –

या सामन्याबद्दल बोलायचे तर सेंट लुसियाचा कर्णधार फाफ डु प्लेसिसने नाणेफेक जिंकून गयाना ॲमेझॉन वॉरियर्सला फलंदाजीसाठी आमंत्रित केले होते. गयाना संघाने २० षटकात ८ गडी गमावून १३८ धावा केल्या होत्या. संघातील जवळपास प्रत्येक खेळाडूला चांगली सुरुवात मिळाली होती, पण कोणीही मोठी खेळी करू शकले नाही. रहमानुल्ला गुरबाज (०) वगळता, इतर खेळाडूंनी किमान दुहेरी आकडा नक्कीच पार केला. मात्र, सर्वाधिक धावा करणाऱ्या ड्वान प्रिटोरियसने (२५) केल्या. शाई होपने २२ धावा आल्या. सेंट लुसियाकडून नूर अहमदने ३ विकेट्स घेतल्या, तर संघाच्या उर्वरित पाच खेळाडूंना प्रत्येकी एक विकेट मिळाली.

इम्रान ताहिरचा संघ ठरला उपविजेता –

सेंट लुसिया संघ १३९ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी मैदानात उतरला, तेव्हा संघाला चांगली सुरुवात मिळाली. मात्र, नंतर ५१ धावांपर्यंत चार विकेट्स पडल्या, पण ॲरॉन जोन्स आणि रोस्टन चेस यांनी ८८ धावांची नाबाद भागीदारी करून सामना १९व्या षटकाच्या पहिल्या चेंडूवर जिंकून दिला. ॲरॉन जोन्स ४८ आणि रोस्टन चेस ३९ धावा करून नाबाद माघारी परतले. कर्णधार डु प्लेसिसने २१ धावांची खेळी केली. गयानच्या चार गोलंदाजांनी प्रत्येकी एक विकेट घेतली. फायनलमध्ये इम्रान ताहिरने शानदार गोलंदाजी केली, परंतु तो यावेळी संघाला विजय मिळवून देऊ शकला नाही.

# OTT वर फ्री आहेत या गाजलेल्या वेब सीरिज, तुम्ही पाहिल्यात का?

करोनानंतर अनेक लोकांनी चित्रपटगृहांत जाऊन चित्रपट बघणं कमी केलं असून , ते ओटीटीवर अधिक सक्रिय झाले आहेत. चित्रपट आणि वेब सीरिज तिथेच पाहणं त्यांना अधिक सोईचं वाटतं. त्यामुळेच मोठमोठे कलाकार आता ओटीटी प्लॅटफॉर्मवर पदार्पण करीत आहेत. मोठे चित्रपट थिएटरमध्ये प्रदर्शित झाल्यानंतर काही दिवसांतच ओटीटीवर प्रदर्शित केले जातात आणि त्यामुळे प्रेक्षकांना घरीच त्याचा आनंद घेता येतो. फक्त चित्रपटच नव्हे, तर वेब सीरिजही अनेक लोक मोठ्या प्रमाणात पाहतात. म्हणूनच आम्ही तुम्हाला काही अशा वेब सीरिजची माहिती देणार आहोत, ज्या तुम्ही ओटीटीवर विनामूल्य पाहू शकता.लोकप्रिय यूट्यूबर भुवन बामची 'ढिंढोरा' वेब सीरिज प्रेक्षकांना प्रचंड आवडली होती. ही भुवनची पहिली वेब सीरिज होती आणि त्याला या सीरिजद्वारे चाहत्यांचं खूप प्रेम मिळालं. जर तुम्ही भुवनचे फॅन असाल आणि त्याच्या व्हिडीओज किंवा सीरिज




पाहणं तुम्हाला आवडत असेल, तर तुम्ही ही सीरिज यूट्यूबवर मोफत पाहू शकता. यूट्यूबर भुवन बाम लवकरच या सीरिजचा दुसरा सीझन घेऊन येत आहे. पहिल्या सीझनमध्ये भुवनने अनेक वेगवेगळी पात्रं साकारली होती. 'ऑपरेशन एमबीबीएस' ही वेब सीरिज एमबीबीएस या अभ्यासक्रमाचं शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांवर आधारित आहे. आयुष मेहरा, अंशुल चौहान व सारा हाशमी यांच्यासह अनेक महत्त्वाच्या व्यक्तिरेखा या सीरिजमध्ये पाहायला मिळतात. एमबीबीएसची डिग्री मिळवणं किती व का कठीण आहे याचा अंदाज प्रेक्षकांना ही सीरिज पाहून येऊ शकतो. या सीरिजमध्ये एमबीबीएसच्या पहिल्या वर्षातील विद्यार्थ्यांची संघर्षमय कहाणी दाखवली आहे. ही सीरिज तुम्ही यूट्यूबवर पाहू शकता. 'एनसीआर डेज' ही वेब सीरिज एका छोट्या शहरातील मुलाच्या आयुष्यावर आधारित आहे, जो एमबीएची तयारी करण्यासाठी एनसीआरमध्ये येतो. त्यात एक सुंदर प्रेमकहाणीही दाखवली आहे. या वेब सीरिजमध्ये अंबरीश वर्मा आणि हीर कौर मुख्य भूमिकांत आहेत. ही सीरिजदेखील तुम्ही यूट्यूबवर मोफत पाहू शकता.'कॅम्पस डायरीज' ही एक कॉमेडी ड्रामा वेब सीरिज आहे, ज्यामध्ये सहा जिगरी मित्रांची गोष्ट दाखवली आहे.

# ट्रॉफी घेऊन सूरज आला माध्यमांसमोर!

'बिग बॉस मराठी'च्या पाचव्या पर्वाची अखेर सांगता झाली आहे. ७० दिवसांचा हा प्रवास चांगलाच गाजला. पहिल्या दिवसापासूनच सदस्यांनी 'बिग बॉस मराठी'च्या घरात हंगामा केला. या पर्वातील प्रत्येक स्पर्धकाने आपल्या खेळाने, स्वभावाने प्रेक्षकांची मनं जिंकली. त्यामुळेच हे स्पर्धक सुपरहिट झाले. शिवाय 'बिग बॉस मराठी'चं पाचव्या पर्वाने टीआरपीचे अनेक रेकॉर्ड ब्रेक केलं.

रविवारी ( ६ ऑक्टोबर ), 'बिग बॉस मराठी'च्या पाचव्या पर्वाचा महाअंतिम सोहळा पार पडला. अभिजीत सावंत, निक्की तांबोळी, जान्हवी किल्लेकर, अंकिता वालावलकर, धनंजय पोवार आणि सूरज चव्हाण हे



टॉप-६ स्पर्धक अंतिम फेरीपर्यंत पोहोचले. पण बाजी मारली सूरज चव्हाणने. तर उपविजेता अभिजीत सावंत ठरला. त्यामुळे सध्या सर्वत्र सूरजसह इतर टॉप-६मधील स्पर्धकांचं कौतुक होताना दिसत आहेत.

'बिग बॉस मराठी'चं पाचवं पर्व जिंकल्यानंतर सूरज आता माध्यमांसमोर आला आहे. पत्रकारांच्या प्रश्नांची उत्तर देण्यासाठी तो सज्ज झाला आहे. सध्या त्याचे व्हिडीओ तुफान व्हायरल झाले आहेत. 'बिग बॉस मराठी'ची ट्रॉफी हातात घेऊन पोज देताना दिसत आहे. प्रिंटेड पांढर शर्ट आणि जीन्स पँट अशा हटके लूकमध्ये पाहायला मिळत आहे. सूरजने केलेल्या या हटके लूकचं 'बिग बॉस मराठी'शी खास कनेक्शन आहे.

सूरजच्या पांढऱ्या रंगाच्या शर्टवर उजव्या बाजूला 'भाऊचा धक्का' लिहिलं आहे. तर डाव्या बाजूला एक बंदूक दिसत आहे. तसंच पँटवर 'झापूक झुपूक', 'बुक्कीत टेंगूळ', 'गुलीगत धोका' असं लिहिलेलं पाहायला मिळत आहे. सूरजच्या या हटके लूकने सध्या सगळ्यांचं लक्ष वेधून घेतलं आहे.

दरम्यान, सूरज चव्हाणला 'बिग बॉस मराठी'च्या ट्रॉफीसह १४.६ लाखांचा धनादेश बक्षीस स्वरुपात मिळाला आहे. सूरज या पैशांचा वापर घर बांधण्यासाठी करणार आहे, असं त्याने माध्यमांशी संवाद साधताना स्पष्ट केलं.

# श्रीलंका क्रिकेट बोर्डाचा मोठा निर्णय!



भारत, इंग्लंड आणि न्यूझीलंडविरुद्धच्या श्रीलंका संघाच्या शानदार कामगिरीनंतर माजी कर्णधार सनथ जयसूर्याची श्रीलंका पुरुष क्रिकेट संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. सनथ जयसूर्याची नियुक्ती १ ऑक्टोबर २०२४ पासून ते ३१ मार्च २०२६ पर्यंत करण्यात आली आहे. नुकतेच श्रीलंकेच्या क्रिकेट संघाने घरच्या मैदानावरील कसोटी मालिकेत न्यूझीलंडचा २-० ने क्लीन स्वीप केला होता. गेल्या काही काळापासून श्रीलंकन संघाच्या या कामगिरीत कमालीचे सातत्य दिसून येत आहे. सनथ जयसूर्याने संघाच्या प्रशिक्षकपदाची जबाबदारी स्वीकारल्यापासून संघाची कामगिरी उत्कृष्ट राहिली आहे.या काळात श्रीलंकेने एकदिवसीय मालिकेत भारताचा पराभव केला, त्यानंतर इंग्लंडला त्याच्याच भूमीवर कसोटी सामन्यात पराभूत केले आणि आता न्यूझीलंडविरुद्ध कसोटी मालिका जिंकली. त्यामुळे आता सनथ जयसूर्याची श्रीलंकेचा पूर्णवेळ प्रशिक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. श्रीलंका क्रिकेटच्या एका निवेदनानुसार , "श्रीलंका क्रिकेटच्या कार्यकारी समितीने भारत, इंग्लंड आणि न्यूझीलंडच्या नुकत्याच झालेल्या दौऱ्यांवरील संघाची चांगली कामगिरी लक्षात घेऊन हा निर्णय घेतला, जिथे सनथ जयसूर्या हंगामी मुख्य प्रशिक्षक म्हणून संघासोबत होता.

# सांगलीतर्फे विष्णुदास भावे गौरव पदक पुरस्कार अभिनेत्री सुहास जोशी यांना जाहीर



**सांगली, (विशाल पाटील) :** अखिल महाराष्ट्र नाट्य विद्या मंदिर समिती सांगलीतर्फे मराठी रंगभूमीवरील मानाचा विष्णुदास भावे गौरव पदक पुरस्कार यंदा अभिनेत्री सुहास जोशी यांना दिला जाणार आहे, अशी माहिती समितीचे अध्यक्ष डॉ. शरद कराळे यांनी दिली.अखिल महाराष्ट्र नाट्य विद्यामंदिर समिती, सांगली ही संस्था ऐंशी वर्षे नाट्यक्षेत्रात कार्यरत आहे. संस्थेतर्फे ५ नोव्हेंबरला रंगभूमी दिन विविध उपक्रमांनी साजरा केला जातो. याच दिवशी नाटककार विष्णुदास भावे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ नाट्यक्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या रंगकर्मीस विष्णुदास भावे गौरव पदक देऊन सन्मानित केले जाते. ५ नोव्हेंबर रोजी रंगभूमी दिनाचे औचित्य साधून सुहास जोशी यांना विष्णुदास भावे गौरव पदक पुरस्कार दिला जाणार आहे. गौरवपदक, रोख रक्कम २५ हजार स्मृतिचिन्ह, शाल व श्रीफळ असे गौरव पदकाचे स्वरूप आहे. सुहास जोशी यांची व्यावसायिक अभिनयाची कारकीर्द विजया मेहता दिग्दर्शित आणि जयवंत दळवी लिखित 'बॅरिस्टर'मध्ये १९७२ मध्ये झाली. सख्खे शेजारी, बॅरिस्टर आणि गोष्ट जन्मांतरीची ही त्यांची गाजलेली नाटके होत. काशीनाथ घाणेकर यांच्यासोबत 'आनंदी गोपाळ'मध्ये त्या होत्या. गंभीर आणि विनोदी अशा दोन्ही प्रकारच्या भूमिका त्यांनी साकारल्या आहेत. बॅरिस्टरमधील त्यांची राधा, सई परांजपेंच्या सख्खे शेजारीमधील मध्यमवर्गीय गृहिणी या महत्त्वाच्या भूमिका होत. ऐंशीच्या दशकात तेंडुलकरांच्या 'कन्यादान' या नाटकात त्यांनी व्यक्तिरेखा साकारली. या नाटकात डॉ. श्रीराम लागू प्रमुख भूमिकेत होते. सुहास जोशींनी श्रीराम लागू यांच्याबरोबर केलेली अग्निपंख, नटसम्राट, एकच प्याला ही नाटके चांगलीच गाजली. मराठी चित्रपटांमधल्या 'तू तिथे मी' मधील अभिनयासाठी उत्कृष्ट अभिनेत्री म्हणून त्यांना चार संस्थांचे पुरस्कार मिळाले आहेत.

# हार्दिक पंड्यापासून विभक्त झाल्यावर नताशाने केली पहिल्या प्रोजेक्टची घोषणा




सर्बियन मॉडेल आणि अभिनेत्री नताशा स्टॅनकोविक पती हार्दिक पंड्यापासून विभक्त झाल्यानंतर आता आपल्या करिअरवर लक्ष केंद्रित करत आहे. विभक्त झाल्यानंतर ती आपल्या मायदेशी सर्बियाला परतली होती, पण आता ती पुन्हा भारतात परतली असून नव्या सुरुवातीसाठी सज्ज आहे. शनिवारी नताशाने तिचा आगामी म्युझिक व्हिडीओ 'तेरे करके'चा पहिला लूक शेअर करून चाहत्यांना आश्चर्याचा धक्का दिला. या गाण्यात ती प्रसिद्ध गायक प्रीत इंदरबरोबर दिसणार आहे. या पोस्टरमध्ये नताशा अगदी ग्लॅमरस दिसत आहे, तर गाण्याच टीझर ६ ऑक्टोबर २०२४ रोजी यूट्यूबवर प्रदर्शित झाल आहे. हे पोस्टर नताशाने तिच्या इन्स्टाग्रामवर पोस्ट केलं आहे. तिने तिच्या पोस्टला कॅप्शन दिलं, "Get ready to groove to the beat of #TereKrke," म्हणजेच 'तेरे करके' च्या तालावर थिरकण्यासाठी सज्ज व्हा. यामुळे चाहत्यांमध्ये उत्सुकता वाढली आहे. नताशाच्या या पोस्टवर हार्दिक पंड्याचा भाऊ कुणाल पंड्याने हार्ट इमोजीने प्रतिक्रिया दिली, तर चाहत्यांनीही नताशाच्या समर्पणाचं कौतुक केलं. एका चाहत्याने कमेंटमध्ये लिहिलं, "ती आता आपल्या मुलासाठी मेहनत करत आहे!! स्ट्राँग लेडी," तर दुसऱ्याने तिच्या लूकचं कौतुक करताना म्हटलं, "मदर इज मदरिंग!" आणखी एका चाहत्याने तिला प्रोत्साहन देत म्हटलं, "बेस्ट ऑफ लक, नताशा; तुला इंडस्ट्रीत परतताना पाहून खूप आनंद झाला." नताशाने आपल्या करिअरची सुरुवात विविध जाहिरातींमधून केली होती आणि २०१३ मध्ये 'सत्याग्रह' या चित्रपटात एका डान्स नंबर 'अइयो जी'मध्ये ती झळकली होती. त्यानंतर तिने विविध विशेष आणि कॅमिओ भूमिका केल्या. २०२० मध्ये आलेल्या 'फ्लेश' या वेब सीरिजनंतर नताशा कुठल्याही कलाकृतीत झळकली नव्हती. आता 'तेरे करके'च्या माध्यमातून ती पुनरागमन करत आहे. हार्दिक आणि नताशाने त्यांच्या विभक्त होण्याची घोषणा इन्स्टाग्रामवर एका पोस्टद्वारे केली होती. अनेक महिने माध्यमांत आणि सोशल मीडियावर त्यांच्या घटस्फोटावर चर्चा आणि तर्कवितर्क सुरू होते. १८ जुलै रोजी त्यांनी आपला घटस्फोट जाहीर केला. त्यांनी परस्पर सहमतीने हा निर्णय घेतला आणि आपला मुलगा अगस्त्यासाठी सह-पालकत्वाची जबाबदारी उचलण्याचा निर्णय घेतला.

## दिनविशेष

**घटना**

२००७ : २००८ आर्थिक मंदी - डाऊ जोन्स औद्योगिक सरासरीने १४,१६४पॉइंट्सच्या सर्वकालीन उच्चांक गाठला, त्यानंतर लावकरच २००८ ची
आर्थिक मंदी येणार होती.
२००६ : उत्तर कोरिया देशाने पहिली आण्विक चाचणी घेतली.
१९८६: द फँटम ऑफ द ऑपेरा लंडनमधील दुसरे सर्वात जास्त काळ चालणारे संगीत, सुरु झाले.
१९७०: भारतीय वायू सेना भारतीय बनावटीचे पहिले मिग लढाऊ विमान हवाईदलाकडे सुपुर्द-
१९६७: अर्नेस्टो 'चे' गुएवारा पकडल्याच्या एका दिवसानंतर, बोलिव्हियामध्ये क्रांती भडकवण्याचा प्रयत्न केल्याबद्दल फाशी देण्यात आली. १९६३ : इटली भूस्खलन दुर्घटना मोठ्या भूस्खलनामुळे वाजोंट धरणाच्या वरून लाट आली आणि किमान २ हजार लोकांचे निधन.
१९६२ : युगांडा - स्वतंत्र राष्ट्रकुल क्षेत्र बनले.
१९४६: भारतीय परराष्ट्र सेवा (Indian Foreign Serives, IFS) - सुरवात.
१९३६: हूवर डॅम मधून वीज निर्मिती करण्यास सुरवात.
१९१४ : पहिले महायुद्ध - अँटवर्पचा वेढा संपला.

**जन्म**

१९६८ : अंबुमणी रामदोस भारतीय राजकारणी, खासदार
१९६६ : डेव्हिड कॅमरुन इंग्लंडचे पंतप्रधान
१९६६: क्रिस्टोफर ओस्टलंड स्वीडिश उद्योजक, प्लाझा मॅगझीनचे संस्थापक
१९४५ : अमजद अली खान भारतीय शास्त्रीय सरोद वादक पद्म विभूषण, पद्म भूषण, पद्मश्री
१९२४ : इमानुवेल देवेन्द्रर - भारतीय सैनिक, स्वातंत्र्य सैनिक, नागरी हक्क कार्यकर्ते (निधन: ११ सप्टेंबर १९५७)
१९०६: लेओपोल्ड सेडर सेघोर सेनेगल देशाचे पहिले राष्ट्रपती (निधन: २० डिसेंबर २००१)
१८९७: एम. भक्तवत्सलम भारतीय राजकारणी, मद्रास राज्यचे ४थे मुख्यमंत्री (निधन: १३ फेब्रुवारी १९८७)
१८७७: गोपबंधु दास - भारतीय समाजसुधारक आणि स्वातंत्र्यसेनानी (निधन: १७ जून १९२८)

**मृत्यू**

२०२२ : टेमसुला एओ - भारतीय कवी आणि लेखक (जन्म: २५ ऑक्टोबर १९४५)
२०२२ : भंवरलाल शर्मा भारतीय राजकारणी, राजस्थानचे आमदार (जन्म: १७ एप्रिल १९४५)
२०१५ : रवींद्र जैन - भारतीय संगीतकार आणि दिग्दर्शक पद्मश्री (जन्म: २८ फेब्रुवारी १९४४)
२०१५ : रिचर्ड एफ. हेक - अमेरिकन रसायनशास्त्रज्ञ आणि शैक्षणिक - नोबेल पुरस्कार (जन्म: १५ ऑगस्ट १९३१)
२०१३ : श्रीहरी - भारतीय अभिनेते (जन्म: १५ ऑगस्ट १९६४)
२००६ : कांशी राम भारतीय वकील आणि राजकारणी (जन्म: १५ मार्च १९३४)
२०००: कर्नल पॅट्रिक अँथनी पोर्टिअस भारतीय-स्कॉटिश सैनिक व्हिक्टोरिया क्रॉस (जन्म: १ जानेवारी १९१८)
१९९९ : नूतन पेंढारकर

## राशी भविष्य

**मेष** - शारीरिक आजारातून बरे होण्याचे शक्यता मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे तुम्ही खेळाच्या स्पर्धांमध्ये भाग घेऊ शकाल. धनाची देवाण-घेवाण आज दिवसभर असेल

**वृषभ** - अनावश्यक घटनांची चर्चा करण्यात वेळ आणि ऊर्जा वाया नका घालवू. एक लक्षात ठेवा वादविवाद चर्चांमधून काहीही हाती लागत नाही, तर काहीतरी हरवतेच.

**मिथुन** - आज तुम्ही ऊर्जेने भरपूर असाल - तुम्ही जे काही कराल त्यासाठी तुम्हाला नेहमीपेक्षा निम्माच वेळ लागेल. तुम्हाला अफलातून नव्या संकल्पना सुचतील ज्यामुळे आर्थिक फायदा संभवतो.

**कर्क** - तुमची कमकुवत इच्छाशक्ती यामुळे तुम्ही भावनिक व मानसिकदृष्ट्या कमजोर बनू शकाल. तुमचे धन कुठे खर्च होत आहे यावर तुम्हाला नजर ठेवण्याची आवश्यकता आहे अथवा येणाऱ्या काळात तुम्हाला समस्यांचा सामना करावा लागू शकतो.

**सिंह** - तुमच्यातील उच्च आत्मविश्वास आज चांगल्या कामासाठी वापरा. धावपळीचा दिवस असला तरी तुमची ऊर्जा टिकून राहील. जर तुमची धन संबंधित काही गोष्ट कोर्ट-कचेरीत आटलेली असेल तर आज त्यात तुम्हाला विजय मिळू शकतो आणि तुम्हाला धन लाभ ही होऊ शकतो.

**कन्या** - कार्यालयात तसेच घरी असलेल्या तणावांमुळे तुम्ही किंचित चिडचिडे बनाल. जे लोक टॅक्सी चोरी करतात ते आज मोठ्या त्रासात फसू शकतात म्हणून, तुम्हाला सल्ला दिला जातो की, टॅक्सी चोरी करू नका.

**तूळ** - तुम्हाला शांत ठेवणा-या उपक्रमांमध्ये स्वत:ला गुंतवा. जर प्रवास करत असाल तर आपल्या महत्वाच्या वस्तूंची काळजी घ्या. जर तुम्ही दुर्लक्ष केले तर सामान चोरी होण्याची शक्यता आहे.

**वृश्चिक** - आरोग्याची काळजी घ्या. पैश्याची किंमत तुम्ही चांगल्या प्रकारे जाणतात म्हणून आजच्या दिवशी तुमच्या द्वारे वाचवलेले धन तुमच्या खूप कामी येऊ शकते आणि तुम्ही कुठल्या मोठ्या अडचणींमधून निघू शकतात.

**धनु** - तुम्हाला नुकताच नैराश्याचा झटका आला असेल तर योग्य पावले उचलली आणि आजच्या विचारांना प्राधान्य दिलेत तरी बरेच समाधान आणि आराम लाभेल.

**मकर** - तुमची चिंता, काळजी मिटविण्याची आत्यंतिक गरज असणारा काळ आहे. आपली शारीरिक उत्साह तर त्यामुळे कमी होतोच पण तुमच्या आयुष्यदेखील कमी होते हे आपणास लक्षात घ्यावे लागेल.

**कुंभ** - स्वत:ला क्रिएटिव्ह कामात गुंतवून घ्या. काहीही न करता बसून राहण्याची आपली सवय मानसिक शांततेला घातक ठरू शकते. आपली गुंतवणूक आणि भविष्यातील ध्येयांबद्दल गुप्तता बाळगा.

**मीन** - तुम्हाला उत्तेजित करणा-या, उल्हसित करणाऱ्या उपक्रमात स्वत:ला गुंतवा, त्यामुळे तुम्हाल बराच आराम मिळेल. झटपट पैसा कमावण्याची तुम्हाला इच्छा होईल.

# वायू प्रदूषण नियंत्रणासाठीच्या मार्गदर्शक तत्वांचे काटेकोरपणे पालन करा



**मुंबई (यश सावंत) :** गेल्या काही दिवसांपासून मुंबईतील वायू प्रदूषणात वाढ झाली असून ते रोखण्यासाठी यापूर्वीच काढण्यात आलेली मार्गदर्शक तत्वे व प्रमाण कार्यपद्धतीचे बांधकाम आणि प्रदूषणाशी संबंधित सर्व सरकारी तसेच खासगी संस्था, संघटना आदींनी काटेकोरपणे पालन करावे, असे आदेश महानगरपालिका आयुक्त व प्रशासक भूषण गगराणी यांनी सोमवारी दिले.

सर्व सरकारी तसेच खासगी संस्था, संघटना यांच्याकडून ही मार्गदर्शक तत्त्वे आणि प्रमाण कार्यपद्धतीची काटेकोर अंमलबजावणी केली जात आहे की नाही यावर देखरेख ठेवण्यात येणार असल्याचेही गगराणी यांनी सांगितले. वायू प्रदूषणासाठी कारणीभूत ठरत असलेल्या छोट्यामोठ्या घटकांवरही अधिक लक्ष केंद्रीत करण्यात आले आहे. बांधकामाच्या ठिकाणी स्वयंपाक बनवण्यासाठी लाकूड व तत्सम बाबी इंधन म्हणून जाळणे तसेच शेकोटी पेटवणे यासारखे प्रकार रोखण्यासाठी प्रयत्न केले जाणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

मुंबईतील वायू प्रदूषण नियंत्रणासंदर्भात विविध मुद्द्यांवर महानगरपालिका मुख्यालयात आयोजित बैठकीत चर्चा करण्यात आली. संबंधित विभागांनी आपापल्या स्तरावरील धोरणे, कार्यवाही यांची माहिती यावेळी सादर केली. मार्गदर्शक तत्वानुसार, सर्व प्रकल्प प्रस्तावकांनी ७० मीटरपेक्षा जास्त उंचीच्या बांधकाम प्रकल्पाभोवती किमान ३५ फूट उंच पत्रा/धातूचे आच्छादन उभारणे अनिवार्य आहे. याशिवाय, बांधकामाधीन इमारतींना सर्व बाजूंनी हिरवे कापड/ज्यूट/ताडपत्रीने पूर्णपणे झाकून बंदिस्त करणे बंधनकारक आहे. बांधकामाच्या ठिकाणी धूळीचे कण निर्माण होण्यास कारणीभूत ठरणारा राडारोडा व अन्य साहित्यावर सातत्याने आणि न चुकता पाण्याची फवारणी करणे, बांधकाम साहित्य वाहून नेणारी सर्व वाहने पूर्णपणे झाकलेली असावीत, बांधकाम प्रकल्पाच्या ठिकाणी सामानांची ने-आण करणाऱ्या वाहनांची चाके स्वच्छ असल्याची खात्री करण्यासाठी सर्व बाजूंनी सीसीटीव्ही कॅमेरे लावणे, ग्राइंडिंग, कटिंग, ड्रिलिंग, सॉइंग आणि ट्रिमिंगचे काम बंदिस्त भागात करणे, केवळ ट्रॅकिंग सिस्टम बसवलेल्या वाहनाचा वापर करणे आदी विविध मार्गदर्शक तत्वांचे पालन करणे विकासकांना बंधनकारक करण्यात आले आहे.

दरम्यान, आठ वर्षांहून अधिक जुन्या अवजड डिझेल वाहनांना मुंबईत वाहतूक करण्यास सक्त मनाई असणार आहे. तसेच, बांधकामाच्या ठिकाणी वास्तव्यास असलेल्या कामगारांसाठी जेवण तयार करण्यासाठी वापरात येणाऱ्या लाकूड व तत्सम इंधनामुळे वायुप्रदूषण होऊ नये, यासाठी संबंधित विकासकांनी कामगारांच्या भोजनाची व्यवस्था करावी, अशा सूचनाही विकासकांना करण्यात आल्या आहेत.

## अंमलबजावणीच्या देखरेखीसाठी पथक तैनात

वायू प्रदूषण कमी करण्यासाठी प्रसिद्ध करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वांची योग्यरीत्या अंमलबजावणी केली जात आहे की नाही यावर देखरेख ठेवण्यासाठी प्रत्येक विभागात पथक तैनात करण्यात येणार आहे. या पथकात एक वाहन, दोन प्रभाग अभियंत्यांसह एक पोलीस आणि मार्शलचा समावेश असणार आहे. प्रत्येक पथकाचे नेतृत्व विभाग कार्यालयातील एक वरिष्ठ अधिकारी करणार आहे.

### विभागनिहाय पथकांची संख्या

१) लहान विभाग- प्रत्येक विभागासाठी दोन पथके
२) मध्यम विभाग- प्रत्येक विभागासाठी चार पथके
३) मोठे विभाग- प्रत्येक विभागासाठी सहा पथके

# अनधिकृत बांधकाम कोसळून महिलेचा मृत्यू , ठेकेदारांनी केला पुरावा नष्ट




**वसई (सुचिता देशमुख) -** कामण येथे अनधिकृत बांधकाम सुरु असताना भींत कोसळून एक महिला ठार झाली तर तीन मजूर जखमी झाले. ही घटना शुक्रवारी दुपारी घडली होती. मात्र विकासक आणि ठेकेदाराने हे प्रकरण दडपून पुरावा नष्ट केला होता. शिवसेनेने या प्रकरणी आंदोलनाचा इशारा दिल्यानंतर सोमवारी पोलिसांनी गुन्हा दाखल करून ४ जणांना अटक केली. वसई विरार शहरात मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बांधकामे सुरू आहेत. शुक्रवारी दुपारी वसई पूर्वेच्या कामण येथील बेलकवडी परिसरात चाळींचे अनधिकृत बांधकाम सुरू होते. दुपारी दीडच्या सुमारास मजूर जेवण करण्यासाठी बसले होते. त्यावेळी निकृष्ट असलेली भींत अचानक कोसळली. या दुर्घटनेत रुक्षणा लहाने (२२) ही तरुणी जागीच ठार झाली तर अन्य ३ मजूर जखमी झाले. मात्र ठेकेदार आणि विकासकांनी ही दुर्घटना लपवून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी मयत महिलेच्या नातेवाईकांवर याबाबत कुठेही वाच्यता न करण्यासाठी दबाव टाकला. नातेवाईकांना पैसे देऊन मृतदेहाचे शवविच्छेदन न करता मृतदेह अंत्यविधीसाठी त्यांच्या गावी पाठवून दिला. तसेच पुरावा नष्ट करण्यासाठी परिसरातील गोदामाचे सीसीटीव्ही देखील काढून टाकले. ही बाब पालघर जिल्हा शिवसेना (शिंदे गट) प्रमुख निलेश तेंडोलकर यांना समजल्यानंतर रविवारी त्यांनी गुन्हे दाखल न केल्यास आंदोलनाचा इशारा दिला. त्यानंतर सोमवारी नायगाव पोलिसांतर्फे पोलिसांनी कुठलीही परवानगी न घेणे, आरसीसी बांधकामाचा नकाशा अभियंत्याकडून तयार करवून न घेणे, निकृष्ट बांधकाम आणि मजुरांच्या सुरक्षेची काळजी न घेणे आदीबाबत भारतीय न्याय संहितेच्या कलम १०५, २३८, ३ (५) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

# साधू वासवानी पुलाचे काम कधी पूर्ण होणार



**पुणे (सुचिता देशमुख) :** पुणे स्टेशन परिसरातील साधू वासवानी पूल पाडण्याचे काम २० टक्के पूर्ण झाले असून, रेल्वे विभाग, वाहतूक पोलीस यांची या कामासाठी परवानगी मिळाली आहे. या पुलाचे संपूर्ण काम पूर्ण होण्यासाठी आणखी दीड वर्षाचा कालावधी लागणार असल्याचे महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी सांगितले. पुणे स्टेशन परिसरात असलेल्या साधू वासवानी पुलाच्या बांधकामाला ५० पेक्षा अधिक वर्षे झाली आहेत. हा पूल वाहतुकीसाठी धोकादायक ठरला होता. त्यामुळे हा पूल पाडून तेथे नवीन उड्डाणपुल उभारण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. हे काम सुरू करण्याची परवानगी मे २०२३ मध्ये देण्यात आली होती. मात्र वाहतूक पोलीस तसेच रेल्वे विभागाची मान्यता न मिळाल्याने हे काम सुरु होण्यास एक वर्षे विलंब झाला. पाच महिन्यांपूर्वी मे २०२४ मान्यता मिळाल्यानंतर रेल्वे प्रशासनाकडून कोरेगाव पार्कच्या बाजुने हा पूल पाडण्याच्या कामाला जून महिन्यात सुरुवात झाली. कोरेगाव पार्ककडील भागातील जुना पूल पाडण्याचे काम महापालिकेने पूर्ण केले आहे. तेथे नवीन पुलाचे काम करण्यासाठी आवश्यक खोदकाम करून पाया करण्याचे काम महापालिकेने सुरू केले आहे.

# त्रिंबकमध्ये केरळच्या अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांविरुद्ध स्थानिकांचा रोष



**नाशिक (सचिन कदम) :** बारा ज्योतिर्लिंगापैकी एक असलेल्या त्र्यंबकेश्वर येथे ब्रम्हगिरी परिसरात फिरणाऱ्या केरळमधील काही अल्पसंख्यांक समाजाच्या विद्यार्थ्यांना स्थानिकांच्या रोषाला तोंड द्यावे लागले. स्थानिकांनी त्यांना पोलिसांच्या ताब्यात दिले. पोलिसांनी चौकशी केली असता आक्षेपार्ह काहीही आढळून न आल्याने त्यांना सोडून देण्यात आले. रविवारी केरळहून १० अल्पसंख्यांक विद्यार्थी त्र्यंबकेश्वर येथील भातखळा धर्मशाळेत दाखल झाले.

# Patna Pirates squad analysis for upcoming Pro Kabaddi League Season 11



New Delhi : The three-time Pro Kabaddi League (PKL) champions Patna Pirates will be eager to reclaim title glory after crashing out in the semi-finals last season. The most successful team in PKL history, the Pirates claimed a hat-trick of Pro Kabaddi triumphs from Season 3 to 5 and will be keen to get their hands on the coveted trophy once again. Narender Redhu, who led Patna Pirates to the semi-finals in PKL 10 as head coach, will once again hope to help the Pirates enjoy another solid campaign and qualify for the playoffs, at the very least. They were one of the busiest teams at the Season 11 Player Auction table and bought more than a dozen players to add to their squad. Here's a closer look at their strengths and weaknesses ahead of the new campaign. Strengths: The Pirates' biggest strength in PKL 11 is likely to be the depth of their squad across both attack and defence. The Season 11 Player Auction saw them buy plenty of talents with defender Shubham Shinde being their most expensive purchase at Rs 70 lakh followed by all-rounder Gurdeep at Rs 59 lakh. Their raiding unit could be led by Sudhakar M, who was a revelation in his debut campaign that saw him notch up 103 raid points. Sandeep Kumar is another promising raider who will look to better his previous tally of 86 raid points for the Pirates in what was also his first PKL season. Their attack also features the likes of Meetu Sharma and Jang Lee, who have amassed 267 and 471 raid points respectively. Similar to their attack, Patna Pirates also boast a lot of numbers and variety in defence. Shubham Shinde and Deepak Singh, who have accumulated 151 and 61 tackle points in PKL respectively are expected to be their leaders in defence, while all-rounders Gurdeep and Ankit are also likely to chip in. Gurdeep has 85 tackle points under his belt in PKL, whereas Ankit managed 66 tackle points in his sole season so far. Weaknesses: As far as weaknesses are concerned, the lack of quality like-for-like replacements from last season in both attack and defence could potentially hurt the Pirates. Despite their squad depth and quantity of players and the lack of quality options to replace the likes of their lead raider last season, Sachin along with ex-skipper Neeraj Kumar may come back to haunt Patna Pirates. Krishan, who was their best defender last season with 78 tackle points, won't be a part of the team in the upcoming season either, meaning the Pirates are without both their best raider and defender from last season. With Jang Lee being the only raider in their team to play more than 60 games in PKL, the lack of experience in attack coupled with the Pirates' defensive frailties cannot be ignored.

# India's World No 92 Ayhika Mukherjee stuns Korean World No 8 Shin Yubin



India's Asian Games doubles medallist Ayhika Mukherjee was back to her giant-killing ways in singles, beating World No 8 Shin Yubin of Korea in the team quarterfinals of Asian Championships table tennis at Astana, Kazakhstan, on Tuesday.

In a stunning blitz, Ayhika twice parried off Shin's comebacks, to win 11-9, 7-11, 12-10, 7-11, 11-7.

Playing the first match of the tie against second-seeded team Korea, Ayhika was fielded to play the first singles – dealt the toughest player of the deck. Shin is a 20-year-old Korean whiz who reached the semifinals of Paris Olympics.

Korea have two main players, Shin and Jeon Jijhee who is World no.16, and the audacious paddler from Bengal was tasked with playing the first match so that Manika Batra could get a winnable matchup against Jeon to double the points. India's highest-ranked ranked Sreeja Akula, got the easier match as she was easing back into competition, after coming back from injury. Ayhika would fight back from 2-8 down in the crucial third game to win it 12-10. Left out of the Olympics where Archana Kamath was in her place, Ayhika, who won Asiad doubles bronze with state mate Sutirtha Mukherjee, was determined to prove the fight is burning in her. Ayhika was able to defend Shin's forehand attacks with the really difficult backhand slices. What was impressive as always was her calmness under pressure.

# Injured Musheer Khan & Sarfaraz Khan celebrate Irani Cup victory With Their Father



Musheer Khan missed theIrani Cup tournament for Mumbai due to an injury from car accident but that did not stop him from celebrating the triumph.

The cricketer shared a picture with his brother Sarfaraz and father Naushad Khan from the Irani Cup felicitation ceremony which took place in Mumbai.

Musheer was travelling with his father Naushad Khan from Azamgarh to Lucknow to take part in the Irani trophy when his car hit a divider and overturned on the Purvanchal Expressway. Musheer sustained a neck fracture, while his father suffered minor injuries. The young batter is expected to be out of action for a some time due to his injury.

Despite his absence, Mumbai went on to win the trophy after a gap of 27 years. Mumbai's Irani Cup-winning captain, Ajinkya Rahane, shared that both he and head coach Omkar Salvi faced immense pressure during the last day's first session of the match against the Rest of India team. The tense situation kept them on edge, especially when the team was struggling at 153-6.


However Mumbai's lower order turned the game around when Sarfaraz Khan and Shardul Thakur were dismissed early on the final day. Spin all-rounder Tanush Kotian's unbeaten 114 and Mohit Avasthi's 51* helped secure a crucial first-innings lead.

This marks Mumbai's first Irani Cup win since the 1997-98 season. The domestic cricket giants reached the finals eight times since then but fell short on each occasion, with their last appearance in the 2015-16 season.

While Musheer was not able to play in the Irani Trophy, his brother Sarfaraz scored a thundering double hundred in the first innings for Mumbai. After being awarded the player of the match, Sarfaraz, dedicated the win to his brother.

"This trophy is the team's, but I promised at home that I would make a hundred for Musheer. This one is for him," Sarfaraz told the broadcaster during the post-match interview

# Thank you for unforgettable memories": Manu Bhaker pens down farewell note for Dipa Karmakar



New Delhi : Double Olympic medallist Manu Bhaker penned down a farewell note for Dipa Karmakar and thanked the gymnast for all the unforgettable memories.

Earlier on Monday, Dipa took to her social media handle to announce her retirement from gymnastics. Taking to her X, Manu Bhaker wished Dipa for her future endeavours after an "incredible" career. "Wishing legendary Dipa Karmakar all the very best in her future endevours after an incredible gymnastics career. Thank you for the unforgettable memories and for inspiring a generation," Manu wrote on X. Dipa scripted her name in the history books after she clinched India's first-ever gold medal at the Asian Championships.

With an impressive total score of 13.566 in the women's vault final, Dipa took home a historic gold medal while South Korea's Kim Son Hyang secured silver and her compatriot Jyo Kyong Byal bagged the bronze.

The return of Dipa and her coach marks a moment of celebration and inspiration for aspiring athletes throughout India, as her success story continues to motivate the next generation of gymnasts.

Karmakar is the first Indian gymnast to compete in the Olympics. The Tripura girl made history by finishing fourth in the women's vault final at the Rio Olympics 2016, missing the bronze medal by a whisker with a score of 15.066 points, only 0.150 less than bronze medal winner Giulia Steingruber of Switzerland.

Karmakar won bronze at the Commonwealth Games 2014 in Glasgow, becoming the first Indian female gymnast to do so in the history of the Games. She bagged bronze at the Asian Gymnastics Championships and finished fifth at the 2015 World Artistic Gymnastics Championships- both firsts for the country.

# लोकशाही बळकट करण्यासाठी ग्रामसभेचे मोठे योगदान .राज्यपाल सी. पी राधाकृष्णन

● पालघर, सुचिता देशमुख :

ग्रामसभा ही केवळ गावकऱ्यांची सभा नसून लोकशाहीचे उत्तम उदाहरण आहे. लोकशाही बळकट करण्यासठी ग्रामसभेचे मोठे योगदान असल्याचे राज्यपाल सी. पी राधाकृष्णन यांनी सांगितले.

जव्हार येथे ग्रामसभा महासंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते त्या वेळी राज्यपाल के.सी. राधाकृष्णन बोलत होते.

यावेळी जिल्हा परिषदेचे अध्यक्ष प्रकाश निकम, खासदार डॉ. हेमंत सवरा, जिल्हाधिकारी गोविंद बोडके, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी भानुदास पालवे, जिल्हा पोलीस अधिक्षक बाळासाहेब पाटील, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी करिष्मा नायर, सत्यम गांधी, वयम संस्थेचे अध्यक्ष विनायक थळकर, , विश्वस्त मिलिंद थत्ते,ग्रामसभेच्या अध्यक्षा संगिता. कुवारा, तसेच नागरिक उपस्थित होते

ग्रामसभा ही एक छोटी लोकसभा आहे जिथे लोकांचे प्रश्न , समस्या ऐकल्या जातात, जिथे समाजाच्या हिताचे निर्णय घेतले जातात आणि जिथे खऱ्या अर्थाने लोक कारभार केला जातो ग्रामसभांना सक्षम बनवण्यात आणि आपल्या ग्रामीण भागातील प्रशासन हा विकासाचा खरा पाया ठरेल असा विश्वास राज्यपाल के.सी.राधाकृष्णन यांनी व्यक्त केला.

आपल्या देशाच्या प्रगतीसाठी, ग्रामसभांना सक्षम, बळकट आणि नेतृत्व करण्यास सुसज्ज केले पाहिजे. समृद्ध भारत आणि आत्मनिर्भर भारताची संकल्पना साकार करण्यासाठी ग्रामसभांचे सक्षमीकरण महत्त्वाचे असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली केंद्र सरकार आपल्या गावांचा आणि आपल्या आदिवासी समाजाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी कटिबद्ध आहे. महाराष्ट्र राज्याला आदिवासी समाजातील विविधतेचे वरदान लाभले आहे. भिल्ल, गोंड-माडिया, कातकरी, कोळी, वारली आणि इतर समाज आपल्या सांस्कृतिक जडणघडणीचा अविभाज्य घटक आहेत. त्यांच्या परंपरा आपली सामाजिक प्रतिष्ठा समृद्ध करतात हा समाज मुख्य प्रवाहात येईल. आपल्या सरकारने पेसा कायदा आणि वन हक्क कायद्याच्या पूर्ण आणि प्रभावी अंमलबजावणीसह आदिवासी समुदायांच्या उत्थानासाठी महत्त्वपूर्ण पावले उचलली आहेत. पंचायती राज कायदा आणि पेसा ग्रामसभांना घटनात्मक मान्यता देतात, ज्यामुळे त्यांना जमिनीचा वापर, संसाधन व्यवस्थापन आणि कल्याणकारी योजनांच्या अंमलबजावणीबाबत महत्त्वाचे निर्णय घेता येतात. ग्रामसभांनी हे सुनिश्चित केले पाहिजे की




सरकारी योजनांचे लाभ - मग ते आरोग्य, शिक्षण, रोजगार, घर किंवा शेती - प्रत्येक पात्र गावकऱ्यांपर्यंत पोहोचतील.

लोकांचा आवाज म्हणून काम करणाऱ्या ग्रामसभांनी जनजागृती आणि या कल्याणकारी कार्यक्रमांमध्ये प्रवेश सुलभ करण्यासाठी सक्रिय भूमिका बजावली पाहिजे. ग्रामसभांना स्वयं-सहायता गट , कौशल्य विकास कार्यक्रम आणि उद्योजकता यांच्याद्वारे आर्थिक सक्षमीकरणाला सक्रियपणे प्रोत्साहन देण्यासाठी प्रोत्साहित करतो. विशेषतः ग्रामसभेच्या बैठका आणि निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग महत्त्वाचा आहे.

महिला हा ग्रामीण भारताचा कणा आहे आणि कोणत्याही गावाच्या विकासासाठी त्यांचे नेतृत्व आवश्यक आहे. डिजिटल प्लॅटफॉर्मचा वापर पारदर्शकता वाढवू शकतो, सरकारच्या विविध स्तरांमधील संवाद सुधारू शकतो आणि विकास प्रकल्पांचा रीअल-टाइम ट्रॅकिंग करू शकतो. ग्रामसभांना महत्त्वाची माहिती आणि संसाधने कार्यक्षमतेने मिळतील याची खात्री करण्यासाठी गावे डिजिटल पायाभूत सुविधांनी सुसज्ज असणे आवश्यक असल्याचे राज्यपाल के सी राधाकृष्णन यांनी सांगितले . जमीन, पाणी आणि जंगलांसह स्थानिक स्त्रोतांचे शाश्वत व्यवस्थापन हे ग्रामसभांच्या प्राथमिक जबाबदाऱ्यांपैकी एक आहे. संसाधन व्यवस्थापनाची जबाबदारी घेण्यासाठी ग्रामसभांना अधिकार देऊन, आम्ही हे सुनिश्चित करू शकतो की या संसाधनांचा कार्यक्षमतेने वापर केला जाईल आणि भविष्यातील पिढ्यांसाठी जतन केला जाईल. पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम आणि वन संरक्षण उपक्रम यासारख्या उपक्रमांना प्राधान्य दिले पाहिजे.नाशिकमध्ये आदिवासी विद्यापीठ निर्माण करण्याचा निर्णय घेतला आहे, ज्यामध्ये AIIMS प्रमाणे तयार केलेले वैद्यकीय महाविद्यालय, IIT सारखी अभियांत्रिकी शाळा आणि IIM सारखी व्यवस्थापन शाळा यासारख्या जागतिक दर्जाच्या संस्थांचा समावेश असेल. या उपक्रमामुळे आदिवासी विद्यार्थ्यांना सर्वोत्कृष्ट शिक्षण मिळण्याची खात्री होईल, सर्वसमावेशकता आणि उत्कृष्टता या दोन्हींना प्रोत्साहन मिळेल.

विकसित भारत हा महामार्ग विकसित गावांमधून जातो. कल्याणकारी योजनांच्या अभिसरणातून आपल्या गावांचा कायापालट करण्यात ग्रामसभांचा मोठा वाटा असल्याचे राज्यपाल सी .पी . राधाकृष्णन यांनी सांगितले राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी जिल्ह्यातील प्रतिष्ठीत नागरीक, उद्योगपती, पत्रकार, खासदार, माजी खासदार, जिल्ह्यातील वरीष्ठ अधिकारी तसेच राजकीय पक्षाचे नेते आणि विविध शिष्ठमंडळ यांच्याशी शासकीय विश्रामगृह, जव्हार येथे संवाद साधला.

## दुर्गोत्सव नव्हे लोकोत्सव! यवतमाळचा नवरात्रोत्सव बघण्यासाठी लाखो भाविकांची गर्दी

● नागपूर, नितीन देवळेकर :

देशातील दुसऱ्या आणि महाराष्ट्रातील पहिल्या क्रमांकाचा दुर्गोत्सव यवतमाळात उत्साहात सुरू आहे. धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक परंपरा जपणारा हा उत्सव डोळ्यांत साठवून ठेवण्यासाठी दररोज लाखो भाविक यवतमाळात दाखल होत आहेत. नवरात्रीच्या पर्वावर होणारा हा दुर्गोत्सव यवतमाळकरांसाठी लोकोत्सव ठरला असून शेकडो हात या उत्सवाला यशस्वी करण्यासाठी अहोरात्र झटत आहेत.



शहरातील विविध मंडळांनी साकारलेले आकर्षक देखावे, दुर्गादेवीची प्रसन्न भाव असलेली मूर्ती, भाविकांसाठी पूर्णवेळ महाप्रसाद आणि त्या जोडीला सामाजिक उपक्रम असे एकूण दुर्गोत्सवाचे स्वरूप आहे. कार्यकर्त्यांच्या परिश्रमाने आणि भक्तांच्या उत्साहाने या दुर्गोत्सवाला नवचैतन्य प्राप्त झाले आहे. जिल्ह्यातील विविध भागांसह परजिल्ह्यातून आणि तेलंगणा, आंध्रप्रदेश, मध्यप्रदेश, गुजरात आदी राज्यातून भाविक यवतमाळात दाखल होत आहेत. दररोज सायंकाळी ५ वाजल्यानंतर पहाटे तीन, चार वाजेपर्यंत गर्दीचा महापूर शहरात ओसंडून वाहत आहे. नवरात्रीच्या चवथ्या दिवसापासून अष्टमीपर्यंत जवळपास २० ते २५ लाख नागरिक हा दुर्गोत्सव बघण्यासाठी यवतमाळात येतात. या उत्सवामुळे स्थानिक रोजगारही वाढला आहे. अनेक मंडळ भाविकांसाठी महाप्रसाद ठेवतात. अनेक छोट्या व्यावसायिकांनी जागोजागी उपवासाचा नाष्टा आदी दुकाने लावली आहेत.

येथील बालाजी चौकातील बालाजी दुर्गोत्सव मंडळाच्या माध्यमातून माजी नगराध्यक्ष सुभाष राय हे गेल्या ३५ वर्षांपासून लंगर उपक्रम राबवित आहेत. छोटी गुजरीमधील एकता दुर्गोत्सव मंडळ, वडगाव रोडवरील सुभाष क्रीडा मंडळाने देवीच्या दर्शनासाठी येणाऱ्या भक्तांसाठी उपवासाच्या फराळाची व्यवस्था केली आहे. अनेक दुर्गोत्सव मंडळ भक्तांचे प्रबोधानही करत आहेत. बेटी बचाव, स्वदेशीचा वापर करा, बचत करा, यासारखे संदेश देण्यात येत आहे.

गणपती मंदिर चौकातील नवशक्ती दुर्गोत्सव मंडळाची अन्नदानाची अखंड परंपरा आहे. मंडळाचे हे ५३ वे वर्ष आहे. या ठिकाणी भाविकांच्या भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे. याशिवाय मंडळ अखंड दीपज्योत ही संकल्पना राबविते. हे दीप नऊ दिवस तेवत असतात.

## नृसिंहवाडीत वयस्कर भाविकांसाठी दर्शन सुलभ

● कोल्हापूर, दिगंबर जाधव :

श्री दत्त प्रभूची राजधानी म्हणून ओळख असलेल्या श्री क्षेत्र नृसिंहवाडीत येणाऱ्या वयस्कर भाविकांना श्री दत्त दर्शन घेणे आता सुलभ होणार आहे. मंदिराकडे जाणाऱ्या घाटावरील जुन्या दगडी पायऱ्यांची उंची एक ऐवजी अर्ध्या फुटाची करण्यात आली असून विजयादशमीपासून याचा वापर केला जाणार आहे. साधारण १४३४ मध्ये दत्त महाराजांचे दुसरे अवतार श्री नृसिंह सरस्वती स्वामी महाराज यांनी आपल्या पादुका येथे ठेवून गाणगापूरला प्रयाण केले. त्यानंतर या मंदिराचा विकास



होत गेला. त्यातील एक टप्पा म्हणजे ५७ पायऱ्यांचा समांतर घाट संत एकनाथांनी बांधला.

दर्शनप्रक्रियेत पायऱ्यांना आणि घाटांना महत्त्व आहेच. हा धागा पकडून दत्त देवस्थानला पूर्वी दोन कोटींची मदत करणारे पुण्याचे उद्योजक विजय कुलकर्णी यांनी ७० लाख रुपये देणगीच्या रूपात पायरी बांधकामासाठी दिले. त्यातून पूर्वीच्या एक फूट उंचीच्या पायऱ्या आता अर्ध्या फुटाच्या करण्यात आल्या आहेत. पाय घसरू नये, यासाठी त्या छिन्नी मारून फुलवल्या आहेत. जुन्या पायऱ्यांच्या बरोबरीने नव्या पायऱ्यांचा वापर होणार आहे.

## मुंबईकरांना 24 तास पाणीपुरवठा अशक्य, पालिका प्रशासनाविरुध्द नागरिकांचा संताप

● मुंबई, विशाल पाटील :

तीनपैकी एकही नवीन पाणी प्रकल्प मार्गी नाही. विडणुकीच्या तोंडावर राजकारणी मंडळींकडून दिलेल्या आश्वासनाची पुर्तता होईलच याची काहीच शक्यता नसते. आताही असेच घडले असून मुंबईकरांना 24 तास पाणीपुरवठा करण्याचे आश्वासन फोल ठरले आहे. त्यामुळे मतांसाठी राजकारण करणा-या राजकारणी लोकांनी जनतेला केवळ मतांसाठी ग्राह्य धरल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे मुलुंडकरांनी संताप व्यक्त केला आहे. मुलुंड व वांद्रे परिसरात 24 तास पाणीपुरवठा करण्याचा प्रयोग फसला असून धरणात इतक्या मोठ्या प्रमाणात पाणीच नसल्याचे पालिका अधिका-यांनी सांगितले आहे. मुलुंड ते घाटकोपर डोंगराळ भागातील पाणीपुरवठा सुरळीत होण्यासाठी मुंबई महानगरपालिका परिमंडळ सहाचे उपायुक्त संतोष कुमार धोंडे यांच्याशी ईशान्य मुंबई महाविकास आघाडीचे खासदार संजय दिना पाटील यांनी वारंवार चर्चा करून काही सूचना केल्या आहेत. मुंबईला 24 तास पाणी पुरवठा केल्यास मुंबईतील भांडुप, कांजुर, घाटकोपर सारख्या उंच भागात रहणा-या नागरिकांना पाणी पुरवठा होणे शक्य नसल्याचे पालिकेचे अधिकारी सांगत आहेत. पाणीपुरवठ्यात सुधारणा करण्यासाठी पालिकेने हाती घेतलेल्या मुंबई जलवितरण सुधारणा कार्यक्रमांतर्गत मुलुंड व वांद्रे परिसरात 24 तास पाणीपुरवठा करण्याचा प्रयोग करण्यात आला होता.

## राज्यपालनियुक्त १२ आमदारांच्या नियुक्त्यांचा तिढा लवकरच सुटण्याची आहेत चिन्हे

● मुंबई, विशाल कारंडे :

विधान परिषदेतील राज्यपालनियुक्त १२ आमदारांच्या गेली चार वर्षे न्यायालयीन कचाट्यात अडकलेल्या नियुक्त्यांचा तिढा लवकरच सुटण्याची चिन्हे आहेत. या प्रकरणी दाखल करण्यात आलेल्या याचिकेवर मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय आणि न्यायमूर्ती अमित बोरकर यांच्या खंडपीठासमोर दोन्ही बाजूंची सुनावणी पूर्ण झाल्यानंतर खंडपीठाने निर्णय राखून ठेवला, तो २३ ऑक्टोबरला जाहीर होण्याची शक्यता आहे.

महाविकास आघाडी सरकारने नावांची शिफारस करून तत्कालीन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्याकडे तशी यादी पाठवली होती. कोश्यारी यांनी त्या यादीवर वेळीच निर्णय घेतला



नाही, यादी जाणूनबुजून रखाडवली. ही कृती राज्यघटनेच्या विरुद्ध आहेर, असा दावा करत या आमदारांच्या नियुक्त्या करण्यात राज्य सरकार चालढकलपणा करत आहे, असा आरोप करून शिवसेनेचे (उद्धव बाळासाहेब ठाकरे) कोल्हापूर शहरप्रमुख सुनील मोदी यांनी उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली आहे, तर या याचिकेत हस्तक्षेप करणारी याचिका माजी आमदार, नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष राजेश क्षीरसागर यांनी केली आहे.

या याचिकेवर मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय आणि न्यायमूर्ती नितीन बोरकर यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. यावेळी याचिकाकर्त्यांच्या वतीने ॲड. यशराज देवरा आणि ॲड. संग्राम भोसले यांनी तत्कालीन राज्यपाल कोश्यारी यांच्या कृतीला आणि राज्य सरकारच्या निर्णयाला जोरदार आक्षेप घेतला. राज्यपाल आणि मंत्रिमंडळाने घटनेतील कलमांचा गैरवापर केला. राज्यपाल है राजकीय पक्षाच्या इशाऱ्यावर रबरी शिका म्हणून काम करीत होते, असा आरोप केला. तसेच राज्यपालांना तत्कालीन उद्धव ठाकरे सरकारने दिलेली यादी परत करता येत नाही. तसेच एकदा मंत्रिमंडळाने घेतलेला निर्णय मंत्रिमंडळाला पुन्हा नव्याने घेता येत नाही असा दावा केला.

## रायगड जिल्हा कॉंग्रेस कमिटी आयोजित खेळ पैठणीच्या खेळात शेवंताची उपस्थिती !



● उरण, भावना जैन :

यमुना सामाजिक शैक्षणिक संस्था शेलघर व रायगड जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांच्या सौजन्याने आयोजित उलवे नोड येथील नवरात्र उत्सवात दिनांक ६ ऑक्टोबर रोजी महिलांसाठी खेळ पैठणीचा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या खेळात शंभराहून अधिक महिलांनी सहभाग घेतला. खेळ पैठणीचा खेळात मुख्य आकर्षक होते रात्रीस खेळ चाले या मालिकेतील शेवंता म्हणजेच अपूर्वा नेमळेकर यांची उपस्थिती होती.अपूर्वा नेमळेकर फक्त उपस्थित राहिल्या नाहीत तर त्यांनी गरबा नृत्याचा आस्वाद घेतला व ठेका धरला. त्यांच्या सहभागाने महिलांचा उत्साह द्विगुणीत झाला. त्यांच्या हस्ते प्रथम क्रमांकाच्या पैठणीच्या मानकरी मोनाली भिलारे, द्वितीय क्रमांक पायल घाडगे, तृतीय क्रमांक संचिता कोळी तर चतुर्थ क्रमांकाच्या मानकरी छाया शेट्टी यांना मानाच्या पैठण्या देण्यात आल्या.तर लकी ड्रॉ द्वारे चार भाग्यवान महिलांना सेमी पैठण्या देण्यात आल्या. कॉंग्रेस जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांच्या संस्थेमार्फत अतिशय सुरेख कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

## डोंबिवलीतील मोक्का आरोपातील तीन जणांची निर्दोष मुक्तता

● कल्याण, विवेक गुंजाळ:

एका दरोड्याच्या प्रकरणात मानपाडा पोलिसांनी १९ वर्षापूर्वी सहा जणांना महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी कायद्याने अटक केली होती. या आरोपींविरुध्द सबळ पुरावा उपलब्ध करण्यास तपास यंत्रणा अपयशी ठरली, तसेच पोलिसांनी या गुन्ह्याचा अतिशय ढिसाळपणे तपास केल्याने डोंबिवली परिसरातील तीन जणांची महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी (मोक्का) न्यायालयाचे न्यायाधीश अमित शेटे यांनी निर्दोष मुक्तता केली. या प्रकरणाचा चुकीच्या पध्दतीने, निष्क्रियपध्दतीने तपास करणाऱ्या मानपाडा पोलीस



ठाण्यातील तत्कालीन पोलीस अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश न्यायालयाने ठाणे पोलीस आयुक्तांना दिले आहेत.

सेल्वराज सुब्रमण्यम मुदलियार (४५), जयराम अच्छेलाल जैस्वाल (३९), अनिल जसराम चौहान (४८), विजय शंकर सावंत अशी निर्दोष सुटका झालेल्या व्यक्तिंची नावे आहेत. या प्रकरणात अनिल यशवंत म्हात्रे, बबन मधुकर कोट हेही आरोपी होते. पण खटला सुरू असतानाच्या काळात त्यांचे निधन झाले होते. त्यामुळे त्यांच्यावरील खटला बंद करण्यात आला होता.या आरोपींवर संघटित गुन्हेगारी कायद्याने सशस्त्र दरोडा आणि संघटित गुन्हेगारीचे आरोप ठेवण्यात आले होते.

ऑगस्ट २००२ मध्ये कल्याण-भिवंडी-नाशिक महामार्गावरील लक्ष्मी हॉटेलमध्ये आरोपींनी सशस्त्र दरोडा टाकून येथील सेवक विजय शिर्केला बेदम मारहाण करून त्याला शस्त्राचा धाक आरोपींनी पैशाची मागणी केली होती. अशा आशयाची तक्रार मानपाडा पोलीस ठाण्यात शिर्के याच्या तक्रारीवरून पोलिसांनी दाखल करून घेतली होती. या प्रकरणात पोलिसांनी सहा आरोपींना अटक करून केलेल्या तपासाच्या आधारे आरोपींवर संघटित गुन्हेगारी कायद्यांतर्गत मोक्का कायदा लावला होता.

मानपाडा पोलिसांकडून न्यायालयात आरोपपत्र दाखल झाल्यावर मोक्का न्यायालयात याविषयावर मागील १९ वर्ष सुनावण्या सुरू होत्या. मोक्का न्यायालयात आरोपी पक्षातर्फे ॲड. सागर कोल्हे, ॲड. हरेश देशमुख यांनी न्यायालयाला आरोपींवर सशस्त्र दरोडा, संघटित गुन्हेगारी कायद्याने दाखल केलेले गुन्हे पूर्णता न्यायाशी विसंगत, चौकशी न करता दाखल केले आहेत, असे सांगून या प्रकरणाचा तपासात अनेक त्रृटी असल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणले.

## वस्त्रोद्योग प्रकल्पासाठी भूमिहिनांच्या जमिनीवर नांगर ?

● पालघर, सुचिता देशमुख :

पालघर जिल्ह्यातील माहीम येथे खासगी उद्योग समूहाच्या वस्त्रोद्योग प्रकल्पासाठी १८१ हेक्टर जमीन संपादित करण्याचे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या (एमआयडीसी) हालचाली सुरु आहेत. मात्र, प्रत्यक्षात ही जमीन भूमिहीन कुटुंबीयांना देण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने १९९१मध्येच दिल्याचे उघड झाले आहे. विशेष म्हणजे गेल्या ३३ वर्षांत सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी झाली नाहीच, उलट गॅसप्रकल्पापासून विमानतळापर्यंतच्या प्रकल्पासाठी



या जमिनीची मागणी होत राहिली. पालघर जिल्ह्यातील माहीम ग्रामपंचायत क्षेत्रातील सर्वे क्रमांक ८३५ आणि ८३६ मधील सुमारे १८१ हेक्टर जागा संपादित करण्याचा एमआयडीसीचा प्रस्ताव असून त्यादृष्टीने जमिनीची मोजणी तसेच वन विभागाच्या आरक्षणाबाबतच तपशील गोळा करण्याचे काम सुरु आहे. जमीन एमआयडीसीमार्फत संपादित करण्यात येणार असली तरी, त्यावर उभारण्यात येणारा वस्त्रोद्योग प्रकल्प एका खासगी उद्योग समूहाचा असेल, अशी चर्चा आहे.